रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ ◆ अंक २५७
www.ramprahar.com
शुक्रवार, ५ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२




## अंबरनाथमध्ये शॉक लागून तीन कामगारांचा मृत्यू



**अंबरनाथ :** पाण्याची टाकी उभारण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागल्याने तीन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना अंबरनाथ येथील जांभूळ गावात गुरुवारी (दि.४) दुपारच्या सुमारास घडली. जांभूळ गावात पाण्याच्या टाकीच्या उभारणीचे काम सुरू होते. त्या ठिकाणी साचलेले पाणी काढण्यासाठी पाण्याचा पंप लावण्यात आला होता. अचानक हा पंप बंद पडल्याने सहा कामगार तो पंप पुन्हा सुरू करण्यासाठी गेले. या वेळी त्यातील तिघा कामगारांनी पंप उचलण्याचा प्रयत्न केला, मात्र पंपाचा विजेचा पुरवठा सुरूच राहिल्याने याचा तीन कामगारांना शॉक बसला. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तिघांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यांचा मृत्यू झाला. गुलशन मंडल, राजन मंडल, शालिग्राम मंडल अशी मृत कामगारांची नावे आहेत.

# विरोधकांकडून महिलाशक्तीचा वारंवार अवमान

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

**अमरावती : प्रतिनिधी**

हनुमान चालिसा म्हटल्याबद्दल खासदार नवनीत राणा यांना १४ दिवस तुरूंगात ठेवणारे उद्धव ठाकरे, काँग्रेसचे राहुल गांधी यांनी महिलाशक्तीचा वारंवार अवमान केला आहे. दुसरीकडे ३३ टक्के आरक्षण देऊन महिलाशक्तीचा सन्मान करणाऱ्या नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी भाजप व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार खासदार नवनीत राणा यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.४) येथे केले.

अमरावती मतदारसंघातील भाजप महायुतीच्या उमेदवार खासदार नवनीत राणा यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या सभेस भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार रामदास तडस, रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते जोगेंद्र कवाडे, आमदार रवी राणा, आमदार प्रवीण पोटे यांच्यासह महायुतीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.



### खासदार नवनीत राणांचा उमेदवारी अर्ज दाखल

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविल्याची खूषखबर आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच देत म्हटले की, न्यायालयाचा निकाल म्हणजे सत्याचा विजय आहे. जात, धर्म, पंथ न मानणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब, शेतकरी, आदिवासी, महिला यांच्या कल्याणाचा अजेंडा राबविला. ३१ कोटी महिलांना कर्ज, तर ८३ लाख महिला बचत गटांना आठ लाख कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले.

हनुमान चालिसा म्हटल्याबद्दल खासदार नवनीत राणा यांना तुरूंगात टाकणाऱ्या उद्धव ठाकरे व त्यांच्या तत्कालीन सरकारवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी जोरदार टीका केली. हनुमान चालिसा भारतात म्हणायचा नाही, तर मग काय पाकिस्तानात म्हणायचा का, असा सवालही त्यांनी केला.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी खासदार नवनीत राणा यांच्या संसदीय कारकीर्दीचा गौरव केला. ते म्हणाले की, खासदार राणा यांनी लोकसभेत अमरावती मतदासंघाबाबत ५३४ प्रश्न विचारले, ११३ चर्चांमध्ये भाग घेतला. अशा अभ्यासू खासदार राणा यांना मतदार निवडून देतील. अन्य मान्यवरांनी खासदार राणा यांना विजयासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## ‘उबाठा’कडे अजेंडा नाही अन् स्वत:चा झेंडाही नाही!

■ मुख्यमंत्री शिंदेंचा ठाकरेंना टोला



**हिंगोली : प्रतिनिधी**

महायुतीमुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पायाखालील वाळू सरकली आहे. घरात बसून उंटावरून शेळ्या हाकणारा मी मुख्यमंत्री नाही. फेसबुक लाईव्ह करून राज्य चालत नाही. ज्यांचे आयुष्य कट, करप्शन आणि कमिशनमध्ये गेले त्या काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसले आहेत. त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार, असा सवाल करीत ‘उबाठा’कडे अजेंडापण नाही व स्वतःचा झेंडापण नाही, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे. हिंगोलीचे उमेदवार बाबुराव कदम-कोहळीकर यांच्यासाठी आयोजित सभेत ते बोलत होते. या सभेनंतर कोहळीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

सभेत मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विरोधकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या द्वेषाने पछाडलेले आहे. मोदींचा जितका तिरस्कार कराल, तितकी त्यांची मते वाढतील. पुढे बोलताना त्यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा आम्ही पुढे चालवत आहोत. म्हणूनच हिंगोलीतून सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी दिली, असे म्हटले.

## पनवेलमध्ये भाजप महिला मोर्चा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

■ लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर यांनी प्रभाग क्रमांक १९मधील महिला पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पनवेल भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये अध्यक्षपदी सपना पाटील, उपाध्यक्षपदी कविता पाटील, सुवर्णा मार्गी, अरुणा पाटील, सरचिटणीसपदी स्नेहल खरे, चिटणीसपदी निकिता पाटील, आशा तळोजकर, जयश्री कामरकर, खजिनदारपदी करुणा कानुगोजे, सोशल मीडिया प्रमुखपदी भारती एकलहरे, तर सदस्य म्हणून अंजू कोळी, सुवर्णा पाटकर, सुमन भालेराव, वृषाली चौधरी, मीनाश्री गीते, अश्विनी देसाई, स्मिता भुतकर, रंजना गोगर, संजिवनी भोईर, सोनल महाडिक यांचा समावेश आहे. **(पान २ वर..)**

## ठाकरे गटाच्या कल्याणमधील उमेदवाराला अंतर्गत विरोध

**कल्याण : प्रतिनिधी**

उबाठा गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत कल्याण लोकसभेतून वैशाली दरेकर यांना उमेदवारी जाहीर केली, मात्र ही उमेदवारी जाहीर करून २४ तास उलटत नाहीत तोच ठाकरे गटात अंतर्गत कलह सुरू झाला आहे. दरेकर यांच्या उमेदवारीला मोठ्या प्रमाणावर ठाकरे गटातूनच विरोध होत आहे.

वैशाली दरेकर यांच्या नावाची घोषणा झाल्याने या उमेदवारीबद्दल दबक्या आवाजात चर्चा सुरू असतानाच गुरुवारी (दि.४) महिला आघाडी, युवा सेना व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने माजी आमदार सुभाष भोईर यांच्या शीळ या निवासस्थानी जमले होते. मलंगगड, अंबरनाथ, कल्याण ग्रामीण, डोंबिवली, कळवा-मुंब्रा येथील अनेक महिला पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सैनिक यांनी दरेकरांच्या उमेदवारीला आक्षेप घेत राजीनाम्याचा इशारा दिला असल्याचे समजते.

या संदर्भात माहिती देताना नाव न छापण्याच्या अटीवर एका पदाधिकाऱ्याने सांगितले की, आम्हाला विश्वासात न घेता ही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे तसेच आम्ही या उमेदवारावर विश्वास ठेवू शकत नाही. आम्हाला आगरी समाजाचा कट्टर शिवसैनिक उमेदवार पाहिजे आणि तशी मागणी आम्ही पक्षश्रेष्ठींकडे करणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. जर हरण्यासाठीच ही उमेदवारी असेल तर आम्ही काम का करायचे? केसेस का अंगावर घ्यायच्या? असा सवालही या पदाधिकाऱ्याने उपस्थित केला आहे. त्यामुळे आता उद्धव ठाकरे यांच्यासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

## निवडक

### काँग्रेसचे प्रवक्ते गौरव वल्लभ यांचा भाजपमध्ये प्रवेश



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा प्रवक्ते गौरव वल्लभ यांनी गुरुवारी (दि.४) आधी पक्षाचा राजीनामा दिला आणि त्यानंतर भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्या उपस्थितीत वल्लभ यांनी ‘कमळ’ हाती घेतले आहे. सनातनविरोधी घोषणाबाजी करू शकत नसल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

### काँग्रेस नेते रणदीप सुरजेवालांचे हेमा मालिनींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे प्रवक्ते आणि वरिष्ठ नेते रणदीप सुरजेवाला यांनी मथुरेच्या भाजप खासदार आणि अभिनेत्री हेमा मालिनी यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. या संदर्भातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यानंतर भाजपने रणदीप सुरजेवालांवर जोरदार टीका केली आहे.



## सुनील तटकरेंना पुन्हा खासदार करण्याचा निर्धार

### मुरूडच्या बैठकीस मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**मुरूड : प्रतिनिधी**

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महाराष्ट्रातून महायुतीचे ४८पैकी ४५हून अधिक खासदार निवडून आणायचे आहेत. यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत. रायगडातून तटकरेसाहेब निवडून आल्यानंतर सर्व सहकारी पक्षांना समान न्याय देतील. तेव्हा कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी गुरुवारी (दि.४) मुरूड येथे केले.

मुरूड शहरातील माळी समाज सभागृहात भाजप बूथ कार्यकर्ता व सुपर वॉरियर्स संमेलन आणि निवडणूक नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी मंत्री तटकरे बोलत होत्या. व्यासपीठावर आमदार रविशेठ पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, गीता पालरेचा, राजेश मपारा, दिलीप भोईर, अलिबाग तालुकाध्यक्ष हेमंत दांडेकर, मुरूड तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, सरचिटणीस प्रवीण बैकर, ज्येष्ठ नेते अण्णा कंधारे, महेश मानकर, जगदीश पाटील, शैलेश काते, जयवंत अंबाजी, बाळा भगत, उमेश माळी, नैनिता कर्णिक उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## सीकेटी महाविद्यालयाचा राष्ट्रीय स्तरावर डंका

### सांस्कृतिक स्पर्धेत परिण मोरेला सुवर्णपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरविद्यापीठ युवा राष्ट्रीय महोत्सव या स्पर्धेचे आयोजन असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे दरवर्षी करण्यात येते. यंदा राष्ट्रीय स्तरावरची ही स्पर्धा पंजाबच्या लुधियाना येथील ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीमध्ये नुकतीच झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त महाविद्यालयाचा विद्यार्थी परिण मोरे (एमए अर्थशास्त्र) याने मुंबई विद्यापीठातर्फे सहभाग घेत एकांकिकेत सुवर्णपदक पटकाविले. त्याने मुंबई विद्यापीठाचे व सीकेटी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर चमकवले आहे.

आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये गेली चारही वर्ष सीकेटी महाविद्यालयाचे विद्यार्थी मुंबई विद्यापीठातर्फे सहभाग घेत आहेत. २०१९-२०मध्ये प्रतिकेश मोरे याने या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन राष्ट्रीय स्तरावर दोन रौप्यपदके, तर २०२२-२३ या वर्षी शिरीष म्हात्रे व राहुल तायडे या दोन विद्यार्थ्यांनी या रौप्यपदक प्राप्त केले होते. यंदा परिण मोरेने सुवर्णपदक जिंकले.

या सुवर्ण यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी परिण मोरे व महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कक्षाचे कौतुक केले. या वेळी माजी नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ, अर्चना ठाकूर, गणेश जगताप आदी उपस्थित होते. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनीही परिणसह टीमचे अभिनंदन केले आहे.

## प्रगतशिल शेतकरी संजीव समेळ यांच्या भात बियाण्याला पेटंट

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील प्रगतशिल शेतकरी संजीव प्रभाकर समेळ यांच्या बसझिना (वाडा कोलम) या गावठी भात बियाण्याला भारत सरकारच्या कृषी विद्यापीठाकडून पेटंट प्रमाणपत्र देण्यात आले आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रगतशिल शेतकरी संजीव समेळ यांचे अभिनंदन केले.

संजीव समेळ यांच्या भात बियाण्याची देशाच्या कृषी विभागाने दखल घेतली असून कृषी विभाग आणि कोकण कृषी विद्यापीठ यांच्याकडून त्यांना कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या हस्ते दापोली विद्यापीठात पेटंट प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रगतशिल शेतकरी संजीव समेळ यांचे अभिनंदन केले. या वेळी भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, पटवर्धन हॉस्पिटलचे सेक्रेटरी राजीव समेळ, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.

## अर्चना पाटील यांना धाराशिवमधून राष्ट्रवादीची उमेदवारी जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि भाजपचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी गुरुवारी (दि.४) राष्ट्रवादीत प्रवेश केला. प्रवेश करतेवेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांना धाराशिवमधून उमेदवारी जाहीर केली.

महायुतीमध्ये धाराशिव हा मतदारसंघ राष्ट्रवादीला मिळाला होता. त्यामुळे या मतदारसंघात अर्चना पाटील यांना उमेदवारी देण्यासाठी त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला आहे. त्यांचे पती आमदार राणाजगजितसिंह पाटील हे मात्र भाजपमध्येच राहणार आहेत. अर्चना पाटील यांना उमेदवारी मिळाल्याने आता जिल्ह्यातील पारंपरिक प्रतिस्पर्धी निंबाळकर आणि पाटील कुटुंबात महालढत पहायला मिळणार आहे.

## मिनी गुढ्यांना नागरिकांकडून मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गुढीपाडवा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सध्याच्या धावपळीच्या युगात साहित्याची जमवाजमव करून गुढी उभारण्यासाठी पुरेसा वेळही मिळणे कठीण झाले आहे तसेच मोठी गुढी उभारायला शहरात जागेचाही प्रश्न असतो. याला पर्याय म्हणूनच रेडिमेड गुढीचा नवा ट्रेण्ड निर्माण झाला आहे. बाजारात या मिनी गुढ्या विक्रीस येऊ लागल्या आहेत.

गुढी म्हणजे आनंद, विजय आणि स्वागताचे प्रतीक. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे (तांब्या) बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. याच गुढीपाडव्यापासून मराठी नववर्ष सुरू होते. यंदा येत्या मंगळवारी म्हणजेच ९ एप्रिल रोजी गुढीपाडवा आहे.



या पार्श्वभूमीवर नवी मुंबई, मुंबई, ठाणे येथील बाजारपेठांमध्ये विविध आकाराच्या आकर्षक गुढ्या ग्राहकांना भुरळ घालत आहेत. साधारण १०० ते ५०० रुपयांपर्यंत विविध आकाराच्या गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. यंदा १० ते २० रुपयांनी गुढ्यांच्या किमतीत वाढ झाली असल्याचे दुकानदार जयेश ढोरे यांनी सांगितले तसेच गेल्या चार-पाच वर्षांपासून रेडिमेड गुढीचा ट्रेण्ड बाजारात आला असून अलिकडे या छोट्या गुढ्यांना ग्राहकांची जास्त मागणी असल्याचेही ते म्हणाले.

पाट आणि त्यावर असलेले नक्षीदार कापड, नारळ, तांब्या, आंब्याची पाने, गुढीभोवती असलेले कापड, हार इत्यादी सर्व साहित्याचा समावेश रेडिमेड गुढीमध्येही पाहावयास मिळतो. त्यामुळे या सगळ्या साहित्याची जमवाजमव करण्यापेक्षा या रेडिमेड गुढ्या घेण्याकडेच लोकांचा ओढा अधिक दिसून येत आहे. सुंदर नक्षीकाम, चमकदार कापड व आकर्षक सजावटीमुळे या मनमोहक रेडिमेड गुढ्या खरेदी करण्याचा मोह नागरिकांना होत असल्याचे चित्र ठिकठिकाणी पहावयास मिळत आहे.

दरम्यान, गुढीपाडवा जवळ येत असल्यामुळे बाजारपेठेत नवीन वस्तू खरेदीसाठी उधाण आले आहे. पाडव्यानिमित्त वस्तू खरेदी करण्याच्या बुकींगसाठी गेल्या काही दिवसांपासून ग्राहक चौकशीस शोरूममध्ये येत आहेत.

# काँग्रेसची गॅरंटी ही चायना मालासारखी

## प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

अनेक वर्षे देशाची सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसने गरिबी हटावसारखी अनेक आश्वासने दिली, मात्र यातले एकही आश्वासन पूर्ण केले नाही. अशा काँग्रेसने पाच गोष्टींची दिलेली गॅरंटीही चायना मेड वस्तूंसारखी आहे, अशी टीका भाजपचे मुख्य प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी (दि.४) केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी समवेत उपस्थित होते.




मुख्य प्रवक्ते उपाध्ये म्हणाले की, केवळ एका घराण्याच्या विकासाची गॅरंटी देणाऱ्या काँग्रेसच्या नव्या गॅरंटीमुळे आता देशातील जनता पुन्हा फसणार नाही. उलट देशाच्या विकासाचा ध्यास घेतलेल्या मोदी सरकारच्या पारड्यात प्रचंड बहुमताने सत्तेचे दान टाकेल. गेल्या दहा वर्षांत प्रत्येक निवडणुकीत मतदारांनी झिडकारल्यानंतरही पुन्हा एकदा जनतेच्या फसवणुकीसाठी मोहब्बत की दुकानसारखे फसवे मुखवटे घालून काँग्रेसी नेते जनतेकडे मतांची याचना करीत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी देशाला विकासाची गॅरंटी दिली. ती पूर्ण करून दाखवली. गरीब, युवक, महिला, शेतकरी या चारच जाती देशात असून त्यांच्या विकासाकरिता भाजप कटिबद्ध असल्याची गॅरंटी पंतप्रधान मोदी यांनी देशाला दिली आहे. गरीबी हटाव नारा देणाऱ्या काँग्रेसच्या काही मोजक्या नेत्यांची आणि पक्षाला वेठीस धरणाऱ्या गांधी घराण्याची गरिबी हटली. देश मात्र अधिकाधिक गरीब होत गेला, असा आरोपही उपाध्ये यांनी केला.

काँग्रेसच्या प्रत्येक घोषणेतील पोकळपणा जनतेस माहीत आहे, याची जाणीव असूनही मोदी यांची नक्कल करताना काँग्रेसने आपली अक्कल एवढी गहाण टाकली की, मोदी मंदिरात गेले की यांचे नेते मंदिरांच्या पायऱ्या झिजवतात, मोदींनी गंगास्नान केले की यांचे नेते डुबकी मारतात. अशा नक्कल करण्याच्या हतबलपणामुळेच आता काँग्रेसने पाच न्याय आणि २५ गॅरंटी दिल्या आहेत. अशा पाच-पंचवीस फसवणुकांतून जनता यापूर्वीही गेलेली असल्याने आता नक्कलदेखील कामाला येणार नाही, अशी खिल्ली उपाध्ये यांनी या वेळी उडवली.

**पंतप्रधान मोदींच्या कार्याची जगाकडून दखल**

पंतप्रधान मोदी केवळ गॅरंटीच्या घोषणा करीत नाहीत, तर गेल्या दहा वर्षांत त्यांनी दिलेली प्रत्येक गॅरंटी पूर्ण केल्याचे देशाने अनुभवले आहे. देशातील २५ कोटी लोकसंख्येच्या कपाळावरील दारिद्र्यरेषा मोदी सरकारच्या प्रयत्नांमुळे कायमची पुसली गेली आहे. कलम ३७० रद्द करणे, राम मंदिर उभारणी, औद्योगिक विकास, रोजगाराच्या संधी, महिलांचे सक्षमीकरण, अशा प्रत्येक क्षेत्रातील मोदी की गॅरंटी खरी ठरते हे लक्षात आल्यावर आता त्यांच्या गॅंरंटीची नक्कल करीत कागदी घोषणा करून काँग्रेस पुन्हा जनतेला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न करीत आहे, असेही उपाध्ये यांनी म्हटले आहे.

# महिलांबाबतच्या विखाराला आवर घाला; अन्यथा जनताच पराभवाची धूळ चाखवेल!

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस पक्ष हा राक्षसी शक्तींचे आगर बनला असून काँग्रेस नेत्यांकडून महिलांना वारंवार गलिच्छ भाषेत अपमानित केले जात आहे. महिलांबाबतच्या या विखाराला काँग्रेसने वेळीच आवर घालावा; अन्यथा जनताच तुम्हाला तुमची जागा दाखवत पराभवाची धूळ चाटवेल, असा इशारा भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.



प्रसिद्धीपत्रकात वाघ यांनी लिहिले की, भारतीय संस्कृतीमध्ये यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवतः अशा शब्दांत स्त्रीशक्तीचा गौरव केला आहे, मात्र त्याच नारीशक्तीचा काँग्रेसकडून वारंवार अपमान होत आहे. काँग्रेसचे खासदार रणदीप सुरजेवाला यांनी स्वतःला सभ्य म्हणवणाऱ्या समाजातल्या कुणाही व्यक्तीची मान शरमेने खाली जावी इतक्या गलिच्छ भाषेत महिलांना उद्देशून घाणेरडी टिप्पणी केली.

त्यांनी आपल्या भाषणात खासदार आणि अभिनेत्री हेमा मालिनीजी यांच्याबाबत सडकी मुक्ताफळे उधळली होती. पहिल्यांदा अभिनय आणि नंतर राजकीय क्षेत्रात स्वतःला सिद्ध करणाऱ्या हेमा मालिनी यांचाच नव्हे; तर स्वकर्तृत्वाने प्रगतीच्या वाटेवरून पुढे निघालेल्या सर्वसामान्य भारतीय स्त्रियांचा हा अपमान आहे.

खासदार सुरजेवाला यांची मुक्ताफळे बघा. ते लिहितात की, आपण आमदार, खासदार कशासाठी बनवतो? जेणेकरून ते आपला आवाज उठवतील. ही मंडळी कुणी हेमा मालिनी तर नसतात, जिला केवळ चाटण्यासाठी बनवले जाते.खासदार महिलेबाबत लिहायची ही कुठली भाषा? एका सहकारी खासदार महिलेचे इतक्या घाणेरड्या शब्दांत वर्णन करायची ही काँग्रेसवाल्यांची कुठली संस्कृती, असा परखड सवाल वाघ यांनी प्रसिद्धीपत्रकातून विचारला आहे.

काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या महिला नेत्याने भाजप उमेदवार व अभिनेत्री कंगना राणौत यांच्यावरही अशाच असभ्य शब्दांत टिपणणी केली होती तसेच काँग्रेसचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांनी तर नारीशक्ती संपवण्याची भाषा केली होती. यातून काँग्रेस नेते महिलाशक्तीकडे कोणत्या दृष्टीतून पाहतात हेच दिसले, असेही वाघ यांनी पत्रकात नमूद केले आहे.

# रस्त्यावरील गुरांना वाचवण्याच्या प्रयत्नात कार उलटली

**सहा जण जखमी**

**महाड : प्रतिनिधी**

महाड-विन्हेरे राज्यमार्ग ७२वर बुधवारी मध्यरात्री १ वा.च्या सुमारास रस्त्यावर गुरे आडवी आल्याने अचानक ब्रेक लावून झालेल्या अपघातात इर्टीगा कार जागेवर उलटली. या अपघातात कारमधील सहा जण जखमी झाल्याची घटना महाडजवळील शिरगावच्या हद्दीत घडली.

वसई येथून इर्टीगा (एमएच ४७ एजी ६६१०) कारमधून प्रवास करीत असताना महाडजवळील शिरगाव ग्रामपंचायत गोमंतक जवळ रस्त्यावर अचानक गुरे आडवी आल्याने अचानक ब्रेक लावून झालेल्या अपघातात कार जागेवर उलटली. या अपघातात सागर वसंत गुंजाळ (वय ३०, रा. अंधेरी), रोशन कृष्णमोहन त्रिपाठी (वय २८, रा. वसई), सोनू राजाराम पटेल (वय ३०, रा. वसई), राजेश मुकुंद निर्भवते (वय ५०, रा. गोरेगाव, मुंबई), पंकज प्रकाश पवार (वय ५०, रा. गोरेगाव, मुंबई), देवदत्त वासुदेव घाटी (वय ३०, रा. विरार) हे जखमी झाले असून त्यांना महाड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.




याबाबतचा तपास महाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार लांडगे करीत आहेत.

# भ्रष्टाचारमुक्त भारत हा पंतप्रधान मोदींचा नारा, म्हणूनच भाजपला पाठिंबा -ना. रामदास आठवले

**डेहराडून : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मागील १० वर्षात देश विकासाच्या देशेने पुढे जात आहे. भारत भ्रष्टाचारमुक्त करण्याचे काम मोदींनी केले आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत मोदींचा आहे नारा असल्याने आमचा भाजपला पाठिंबा आहे, असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी उत्तराखंडच्या लोकसभेच्या सर्व पाच जागांवर भाजपला रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा जाहीर केला.

डेहराडूनच्या विकास सिने हॉल येथे रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता बैठकीत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भाजपच्या उत्तराखंडमधील लोकसभेच्या सर्व पाच जागांवर रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा जाहीर केला. या वेळी रिपब्लिकन पक्षाचे उत्तराखंडचे प्रमुख सेठपाल सिंग उपस्थित होते, तसेच उत्तराखंडच्या १२ जिल्ह्यांतील रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते हजर होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए सरकार देशात सर्व जाती धर्मियांना सामाजिक, आर्थिक न्याय देत आहेत. रिपब्लिकन पक्ष मागील १२ वर्षांपासून भाजपसोबत आहे. पंतप्रधान मोदींनी सत्तासूत्र हाती घेतल्याच्या पहिल्या दिवसापासून भ्रष्टाचारमुक्त भारतचा नारा दिला आहे. त्यामुळे गरीब जनतेपर्यंत सरकारचा निधी पोहचत आहे, असे या वेळी ना. रामदास आठवले म्हणाले.

# सैन्यदलातून निवृत्त किरण कांबरीचे जल्लोषात स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

१९ वर्षे देशाचे रक्षण करून घरी परतणाऱ्या तालुक्यातील कांबरी कुटूंबातील किरण कांब्री या जवानाचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले.



पोशीर गावातील किरण कांबरी हे २००५ साली भारतीय स्थलसेना सैन्यदलात भरती झाले. त्यांनी तब्बल १९ वर्षे देशसेवा केली. त्यांची पहिली पोस्टिंग जम्मू उधमपूर येथे झाली. त्यानंतर श्रीनगर-लेहमध्ये ते होते. दिल्ली पूच येथे स्पेशल फोर्समध्ये तीन वर्षे होते. नक्षल भागात किरणने ठिकठिकाणी सैनिक म्हणून चोख कामगिरी बजावली. २०१२मध्ये राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्यासमोर एक प्रेझेंटेशन सादर केले होते. सैन्यलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पोशीर गावी ग्रामस्थांनी आयोजित केला होता. ढोलताशा, वाजत गाजत रथातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली.

# पनवेल परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी टोईंग व्हॅन पुन्हा सुरू



**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही महिन्यांपासून बंद असलेली टोईंग व्हॅन आता पुन्हा सुरू झाल्याने पनवेल व नवीन पनवेल परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पनवेल तसेच नवीन पनवेल भागातील वाहतूक शाखेची टोईंग व्हॅन सेवा बंद करण्यात आली होती. त्यामुळे शिस्तीला लागलेले वाहनचालक पुन्हा बेशिस्त झाले होते व कोणीही कशाही पद्धतीने आपली वाहने रस्त्यावर उभी करीत होती.

याचा प्रामुख्याने सकाळी व संध्याकाळी नोकरी धंद्यानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या चाकरमान्यांना त्रास होत होता.

या संदर्भात सोशल मिडीयाच्या माध्यमातून सुद्धा पुन्हा टोईंग व्हॅन सुरू करण्यासंदर्भात मागणी करण्यात येत होती. याबाबत अनेकांनी संबंधित वाहतूक शाखेबरोबर पत्रव्यवहार करून पुन्हा शिस्त लावणारी टोईंग व्हॅन सुरू करा, अशी मागणी केली होती. या मागणीनुसार व आगामी सण, सुट्ट्या, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा आजपासून टोईंग व्हॅन सुरू झाली आहे. यामुळे आता पुन्हा एकदा बेशिस्त वाहन चालकांना शिस्तीचे धडे मिळणार आहेत. या टोईंग व्हॅनचे पनवेलकरांनी स्वागत केले आहे.




**पनवेल : ज्येष्ठ नागरिक संघाच्या हिशोब तपासनीसपदी संस्थेचे सभासद काशिनाथ लक्ष्मण जाधव यांची एकमताने निवड झाली आहे. शासकीय सेवेत असताना त्यांनी प्रदीर्घकाळ विविध सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण केले. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

## पान १ वरुन



### पनवेलमध्ये भाजप महिला मोर्चा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची गुरुवारी भेट घेतली. त्यांनी पुष्पगुच्छ देऊन या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर उपस्थित होत्या.

### सुनील तटकरेंना पुन्हा खासदार करण्याचा निर्धार

मंत्री आदिती तटकरे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की, अनंत गीते यांनी कोणतेही विधायक काम केलेले नाही. संपूर्ण जगात पंतप्रधान मोदीसाहेबांचे नाव आहे. त्यामुळे त्यांच्यावर टीका करण्याचा विरोधकांना अधिकार नाही. महिला सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्यातील सरकार मोठे काम करीत असून लवकरच महिलांच्या विकासाच्या योजना कार्यान्वित होऊन महिला विकासावर विशेष भर दिल्याचे दिसून येईल.

आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, पक्षाच्या आदेशाप्रमाणे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांचे काम करणार असून त्यांना निवडून आणणार आहोत. यासाठी महायुतीमधील प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रात्रीचा दिवस करावा.

जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी, हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांना तहसीलदारांकडून दंडाच्या नोटीस बजावण्यात आल्याचे सांगून यासह राजपुरी कोळीवाड्याचा प्रश्न समजावून घेत यावर उचित तोडगा काढून न्याय मिळवून देण्याचे आवाहन केले. महायुतीचा धर्म पाळून रायगडचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना निवडून देण्यासाठी सर्वांनी मिळून एकदिलाने काम करूया, असेही ते या वेळी म्हणाले.

ज्येष्ठ नेते अण्णा कंधारे यांनी, अलिबाग मुरूड विधानसभा मतदासंघातून १९ हजार ९६६ मतांचा लीड मागील निवडणुकीत तटकरेसाहेबांना मिळाला होता. यंदा हा लीड तिप्पट होण्यासाठी प्रयत्न केले जातील व तटकरे यांना विजयी केल्याशिवाय कोणताही कार्यकर्ता स्वस्थ बसणार नाही, असे म्हटले.

# माथेरानमध्ये घोड्यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमधील दस्तुरी येथील असलेल्या धोबी तलावातील ऐन सुरू झालेल्या उन्हाळ्यात पाणी आटले असल्याने मात्र दस्तुरी ते माथेरान बाजारपेठ अशी मालवाहतूक करणाऱ्या घोड्यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

यंदाचा उन्हाळा सुरू झाल्याने यंदा हे धोबी तलाव अटले असल्याने या मालवाहतूक घोडयांची पिण्याच्या पाण्यापासुन वणवण सुरू झाली आहे. या संदर्भात आम्ही या पूर्वी माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेचे कार्यरत प्रभारी मुख्यकार्यकारी अधिकारी रामदास कोकरे यांना आमच्या मालवाहतूक घोडयांसाठी नळाची व्यवस्था करून देण्याची व त्यासाठी आम्ही येणारे पाण्याचे बिल भरण्यास तयार असल्याची मागणी केली होती. अद्यापपर्यंत आमची मागणी पूर्ण झाली नसून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. या धोबी तलावातून एमटीडीसीकडून पंपाव्दारे पाणी उचलले जात असल्याने तलावाची पाणीपातळी खालावली आहे, असे मालवाहतूक मालक आणि चालकांनी सांगितले.



# कुष्ठरोग जनजागृती आणि मानव अधिकारावर कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुष्ठरोग निर्मुलनासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे. माजी उपराष्ट्रपती व्यंकैय्या नायडू यांच्या नेतृत्वाखालील राज्यसभेच्या समितीने केंद्रसराकडे १८ सूचना केल्या होत्या, ज्यातील काही सूचना स्विकारल्या गेल्या, पण त्यांची अंमलबजावणी झाली नाही. ते काम पूर्ण करण्यासाठी राज्यसभेच्या पिटीशन कमिटीला पुन्हा विनंती अर्ज करण्याची गरज आहे. तसे काम कुष्ठरोग निर्मुलनासाठी काम करणाऱ्या संघटनांनी करावे, त्याचबरोबर कुष्ठरोग्यांना जीवनभत्ता आणि घरे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत माजी राज्यपाल राम नाईक यांनी व्यक्त केले.



ते अलिबाग येथे कुष्ठरोग जागृती आणि मानवाधिकार या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. या वेळी शांतिवन संस्थेचे विश्वस्त उदय ठकार, कुष्ठरोग निवारण संस्था पुणेचे कार्यकारी संचालक शरद भोसले, मिथीला गोखले, आनंद नवाथे, अतिरीक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. शितल जोशी, त्वचारोग तज्ज्ञ सुरेश विरकूट आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रात महानगरपालिकांकडून कुष्ठरोग पिडीतांना जीवन भत्ता दिला जातो. महापालिकेच्या आर्थिक क्षमतेनुसार ही रक्कम दिली जाते. या योजनेचा लाभ प्रत्येक कुष्ठपिडीताला व्हायला हवा, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

**दुखवटा**

### सुधीर पुराणिक



**पाली** : मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव, पालीतील शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक सुधीर पुराणिक यांचे बुधवारी (दि.३) दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पाली शहरावर व पुराणिक कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रा. सुधीर पुराणिक यांना श्रद्धांजली वाहिली. पुराणिक यांनी त्यांच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज. नौ. पालिवाला महाविद्यालय पाली सुधागडचे भौतिकशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक म्हणून ३४ वर्षे काम पाहिले. २००५ सालापासून पालीवाला महाविद्यालयाचे ते उपप्राचार्य होते. त्यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून काम केले.

# सुकापूर परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदई सर्कलपासून पुढे नेरेच्या दिशेने जाण्याऱ्या रस्त्यावर विशेषतः सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या मार्गावर भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मागणीवरून रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले. या रस्त्यावर वायर फेन्सिंग करून अन्य वाहतुकीच्या अन्य मार्गांना मर्यादा आणल्याशिवाय या ठिकाणी होणारी वाहतुकी कोंडी सोडवली जाणार नाही. जोपर्यंत हे काम होत नाही तोपर्यंत या रस्त्यावर गाड्या उभ्या करून आपली खरेदी करणे हे जर नागरिकांनी तसेच या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी टाळले तर सायंकाळी या मार्गावर होणाऱ्या वाहतुकी कोंडीचा प्रश्न मार्गी लागे त्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

या वेळी माजी जि.प. सदस्य अमित जाधव, सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील, सुकापूर ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, अशोक पाटील, राजू सनस आदी उपस्थित होते. पाली देवद-सुकापूर ग्रामपंचायत हद्दीतील आदई सर्कल पासून पुढे सुकापूरच्या दिशेने जाणाऱ्या



रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आदई सर्कलपासून पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणावर प्रत्येक बिल्डिंगमध्ये घरामध्ये व्यावसायिक अशा पद्धतीचे काही ना काहीतरी गाळे किंवा दुकान आहेत. भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मागणीवरून आम्ही मधल्या कालावधीमध्ये आदई सर्कलपासून ते ग्रामपंचायतपर्यंत पूर्ण रस्त्याचे शासनाच्या निधीतून, कधी ग्रामपंचायतीच्या निधीतून याचे काँक्रीटीकरण करून घेतलेला आहे. आणि आता या काँक्रीटीकरणाच्या बरोबरीने याच्यामध्ये लोकांना चालण्यासाठी फूटपाथ आणि त्याच्या शेजारी गटार असे त्याच्यामध्ये पूर्णपणे बनवून घेणार आहोत. या परिसरामधली लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे या रस्त्यावर रहदारी वाढलेली आहे. या रस्त्यावर एकंदरीतच वाढलेली वर्दळ पाहता या ठिकाणी वाहतुकीला नियमन करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अधिकृत ॲप्रोचेस तेवढे ठेवून उरलेल्या ठिकाणी या रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटार येणार आहेत त्या गटाराच्या बाजूने त्याच्यावरती वायर फेन्सिंग करणे आणि त्या व्यतिरिक्त अन्य वाहतुकीचा एक्सेस याला मर्यादा आणणे हे केल्याशिवाय इथली वाहतुकीची रोज होणारी कोंडी ते सोडवली जाणार नाही. त्यामुळे या दृष्टीकोनातून भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांमार्फत आम्ही इथल्या रहिवाशांना, ग्रामस्थांना विनंती करणार आहोत.

ज्यांची ज्यांची दुकाने आहेत, गाळे आहेत, हातगाड्या आहेत, त्या सर्वांनी या दृष्टीकोनातून सहकार्य केल्यास त्यांचा व्यवसाय होऊ शकेल त्याचबरोबर लोकांना कुठल्या पद्धतीची असुविधा होणार नाही. जोपर्यंत या संदर्भातल्या कामाला सुरुवात होत नाही. तोपर्यंत रस्त्यावरती गाड्या उभ्या करून आपली खरेदी करणे हे जर नागरिकांनी किंवा येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांनी टाळल तर इथे होणारी तास दीड तासाची कोंडी विशेषत संध्याकाळच्या वेळेमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये कोंडी होते हे टळू शकते. या संदर्भामध्ये नागरिकांनी सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी केली.

# चिपळे पुलाच्या कामाला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर आणि पनवेलच्या पूर्व ग्रामीण भागाला जोडणाऱ्या व महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या चिपळे पुलाला ४८ वर्षे झालेली आहेत. पन्नाशी गाठणाऱ्या या पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळेत हाती घेतले आहे. हे पूल पाडून त्या जागी नवीन पूल बांधण्यात येणार आहे. यासाठी दहा कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पनवेल, चिपळे येथील नवीन पुलाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या पुलासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला होता.

तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली या पुलाच्या रस्त्यासंदर्भात निवेदनही दिले असून डागडुजीच्या कामावेळी पाहणीदेखील केली होती.

नुकत्याच या पुलाचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील आठवड्यात या पुलाच्या कामाला सुरुवात केली आहे. एका वर्षात हे काम पूर्ण होणार आहे. गाढी नदीवर चिपळे येथे १९७५ साली हे पूल बांधण्यात आले होते. या पुलाला २०२६ मध्ये पन्नास वर्षे पूर्ण होणार आहेत, परंतु तत्पूर्वीच बांधकाम विभागाने या पुलाचे काम हाती घेतले आहे. या पुलाचा नेरे, चिपळे, वाजे, गाढेश्वर, धोदाणी, मालडुंगे या परिसरात जाण्यासाठी उपयोग केला जातो. या पुलाचे काम टीआयपीएल कंपनीला मिळाले आहे.

१२ मीटर रुंदी, ६० मीटर लांबी चिपळे येथील नवीन पूल १२ मीटर रुंदीचा होणार आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला पादचाऱ्यांना जाण्या-येण्यासाठी पदपथ असणार आहे. ६० मीटर लांबीचा नवीन मोठा पूल होणार आहे. या पुलाच्या बांधणीसाठी १५ मीटर अंतरावर चार गाळे असणार आहेत, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंते मिलिंद कदम यांनी दिली.

या परिसरात भविष्यात अनेक प्रकल्प उभे राहणार आहेत. सुकापूर, आकुर्ली, नेरे, वाजे, मोरबे परिसरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढलेली आहे. इमारतींचे जाळे तयार होत असल्याने नागरिकांची वस्ती वाढू लागली आहे. त्यामुळे या पुलाचा फायदा होणार आहे.

**चिपळे पुलाचे आयुर्मान दोन वर्षांनी संपणार होते; परंतु वेळेतच सार्वजनिक बांधकाम विभागाने चिपळे पुलाचे काम हाती घेतले आहे. येत्या एका वर्षाच्या आत पुलाचे काम पूर्ण होवून पूल नागरिकांसाठी खुला होईल.**
**-मिलिंद कदम, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

**पनवेल, चिपळे येथील नवीन पुलाच्या कामासाठी व या रस्त्याच्या डागडूजीसंदर्भात आम्ही भाजप पदाधिकारी वेळोवळी पाठपुरावा करतो. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील यांचे नेहमीच मार्गदर्शन मिळते.**
**-विश्वजीत पाटील, पनवेल सरचिटणीस, भाजयुमो**

# पनवेलमध्ये विद्यार्थ्यांतर्फे मतदार जागृती : सायकल रॅली, प्रभात फेरीसह स्पर्धांना प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवरती ३३ मावळ मतदारसंघांमध्ये स्वीप कार्यक्रमांतर्गत गुरुवारी (दि. ४) खारघरमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल यांच्या वतीने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी सायकल रॅली काढण्यात आली. महापालिकेच्या लोकनेते दि.बा पाटील विद्यालयामध्ये निबंध स्पर्धा व शाळा क्रमांक ४ याठिकाणी रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामोळे व नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी ३३ पनवेल विधानसभा मतदारसंघ १८८ अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल ग्रामीण भागात केली जात आहे. पनवेल महापालिकेचे प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ, स्वीप पथक प्रमुख अधिकारी, पालिका मुख्य अभियंता संजय जगताप व गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले हे कार्यक्रम केले जात आहेत.






खारघरमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या वतीने सायकल रॅली घेण्यात आली. या रॅलीची सुरूवात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलपासून झाली त्यानंतर शिल्प चौक, खारघर राजा मंदिर, नवरंग, शंकर मंदिर अशा मार्गाने झाली. या रॅलीमध्ये इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या वेळी मतदार राजा हो लोकशाहीचा धागा हो, वोट देने जाना है देश को आगे बढाना है, आपल्या मताचे दान आहे लोकशाहीची शान, लढला नाहीस तरी चालेल पण मत देताना विकला जाऊ नकोस! असे बॅनरच्या सायकलला लावले होते. त्याचबरोबर चांगू काना ठाकूर व ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामोळे यांनी प्रभात फेरीचे आयोजन केले होते. ही रॅली सीकेटी संकुलापासून ते पिल्ले कॉलेज - विसपुते कॉलेज - नवीन पनवेल रेल्वे स्टेशन - पी.एल. ५ - बांठिया विद्यालय ते शाळा या मार्गावरून काढण्यात आली. रॅलीदरम्यान शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत नागरिकांना मतदान करण्याविषयीचे आवाहन केले. याचबरोबर महापालिकेच्या लोकनेते दि.बा पाटील विद्यालयामध्ये निबंध स्पर्धा व शाळा क्रमांक ४ याठिकाणी रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी पटवून दिले.







**पनवेल : विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, अविनाश गायकवाड, आनंद गोंधळी, प्रल्हाद भोईर, अनंता गायकवाड, सुनील पाटील, संजीव भिंगारकर, राकेश मोरे, माजी उपसरपंच किशोर सुरते, आप्पा गायकवाड, चांगदेव मराठे, अनिल पाटील आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयास मूल्यांकन समितीची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षी विशिष्ट मानांकनाद्वारे मूल्यमापन करून विविध शाखांना कर्मवीर पारितोषिक दिले जाते. सन २०२३-२४ यावर्षी दिल्या जाणाऱ्या कर्मवीर पारितोषिकासाठी संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजला नामांकन प्राप्त झाले असून त्याअनुषंगाने मूल्यमापन करण्यासाठी संस्थेच्या मूल्यांकन समितीने गुरुवारी (दि. ४) विद्यालयास भेट दिली.

संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ॲड.एम. के.खामकर यांच्या अध्यक्षतेखालील मूल्यांकन समितीत मध्य विभागाचे विभागीय अधिकारी आर.एस.साळुंखे, एनकूळ येथील महर्षी शिंदे विद्यालयाचे



माजी मुख्याध्यापक सुरेश दादासाहेब बोटे, उंब्रज येथील महात्मा गांधी विद्यालयाचे माजी लेखनिक दिलीप परबती गंगावणे आदी सदस्यांचा समावेश होता.

प्रारंभी विद्यालयाच्या प्रांगणातील पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे वतीने तसेच स्थानिक शाळा समिती आणि माजी विद्यार्थी संघाच्या वतीने मान्यवरांचे गुलाब पुष्प, लेखनी व ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष वाय. टी.देशमुख, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबरद्वय रवींद्र भोईर व प्रमोद कोळी, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, उमेश पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, चित्रलेखा पाटील, शितलकुमार म्हात्रे, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, द्रौपदी वर्तक, चारुशीला ठाकूर, वृषाली म्हात्रे, योगिता पाटील, गणेश भोईर, प्रणाली पाटील, ज्युनिअर कॉलेज प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, राजू खेडकर, माणिक घरत आदी मान्यवर व शिक्षक उपस्थित होते. मूल्यांकन समितीच्या सदस्यांनी संस्थेने दिलेल्या प्रश्नावलीप्रमाणे पुराव्यांसह तपासणी केली.

## विजय आर्मी स्कूलमध्ये प्रवेश सुरू

**पनवेल** : तालुक्यातील विजय आर्मी स्कुल ॲन्ड जुनिअर कॉलेज, चिखले येथे प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता ७वी ते इयत्ता १२वीसाठी ओबीसी आणि खुल्या संवर्गातील काही रिक्त जागांसाठी प्रवेश सुरू आहे. सहावी व सातवीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा रविवारी (दि. ७) सकाळी ९.३० वाजता होणार आहे. अनिवासी विद्यार्थ्यांनाही प्रवेश घेता येणार आहे. अकरावी विज्ञानसाठी ऑफलाईन प्रवेश नोंदणी सुरू आहे. अधिक माहितीसाठी एम. के. मराठे ९८६७३०१७२५, डी. एन. गावंड ९८६७१२१९६२ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# पोलीस असल्याची बतावणी करून दागिने केले लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून व गावात चोरी झाली असून तुमचे दागिने बघायचे आहेत असे सांगून एक लाखाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन गेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.




सुमित्रा सोन्गार या वावंजे येथे राहतात. घरी असताना त्यांच्याकडे आलेल्या एका व्यक्तीने आपण रत्नागिरीमधील पोलीस असून वावंजे गावात सकाळी चोरी झाली असल्याचे सांगितले. तसेच तुमच्याकडील सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करायची आहे, असे सांगत त्यांचे मंगळसूत्र ताब्यात घेतले. तसेच दागिन्यांच्या पावत्याही मागवून घेतल्या व सोन्याचे दागिने आपल्याकडे घेत पोलीस ठाण्याला येऊन भेटा, असे सांगत दुचाकीवर बसून निघून गेला. पोलीस तोतया असल्याचे समजल्यानंतर सुमित्रा यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हा दाखल केला.


# चिमुकल्या मुलींनी केले रमजानचे रोजे; समाजातून कौतुक


**पनवेल : रामप्रहर वृत्त**


इस्लाम धर्मियांचा पवित्र मानला जाणारा रमजान महिना सध्या सुरू असून पनवेलमधील तीन व नागोठणे येथील एका अशा चार चिमुकल्या मुलींनी कडक उन्हाळ्यातही तब्बल १४ तासांचा निर्जल्य पद्धतीचा उपवास ठेवल्याने त्यांचे कौतुक केले जात आहे.

इस्लाममध्ये कलमा, नमाज, रोजा, जकात, हज हे पाच प्रमुख तत्व आहे. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात रोजे (उपवास) करतात. मोठ्यासह लहान मुलेही रमजानचे उपवास करतात. प्रामुख्याने सात वर्षांपेक्षा लहान









मुले रोजाचा उपवास करीत नाहीत, परंतु पनवेल पटेल मोहल्ला येथील शगुफ्ता सोलकर (वय पाच), माहिरा नाखवा (वय सात), सिदरा मखजनकर (वय पाच) आणि नागोठणे येथील आयशा पठाण (वय नऊ) या चार चिमुकल्या मुलींनी कडक उन्हाळ्यातही तब्बल १४ तासांच्या निर्जल्य पद्धतीचा रोजा ठेवल्याने कुटुंबातील सदस्यांसह नातेवाईक आणि शेजारीदेखील त्याचे कौतुक करीत आहेत.

यावर्षी १२ मार्चपासून पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून मुस्लिम बांधव या महिन्यात रोजा ठेऊन अल्लाहप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करत असतात. हे रोजे ठेवणे प्रत्येक मुस्लिम बांधवांवर अनिवार्य असले तरी लहान मुले, वृद्ध, रुग्ण, गरोदर महिला, बाळंतीण आणि प्रवाशांना यातून वगळण्यात आले आहे, मात्र लहान मुलांना ईशपरायण आणि संस्कारक्षम व्यक्ती बनविण्यासाठी त्यांना बालवयापासूनच प्रशिक्षित करण्याच्या उद्देशाने रोजा ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. रमजान महिन्यातील उपवास हे ईशकृतज्ञ होण्यासाठी आवश्यक आणि संस्कारक्षम व चारित्र्यसंपन्न व्यक्ती होण्यासाठी प्रशिक्षणाचा भाग असल्याचे मानले जातात.

## संपादकीय

# सर्वोच्च जालीम डोस

अवास्तव दावे करणाऱ्या औषधांच्या जाहिराती ही आधुनिक भारताची डोकेदुखी म्हटली पाहिजे. टीव्हीवर किंवा सोशल मीडियावर अशा प्रकारच्या जाहिराती आजही दिसतात. हा एक प्रकारे रुग्णाच्या जिवाशी खेळच ठरतो. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली हे दिलासादायक आहे.

**वारेमाप दावे करणाऱ्या औषधांच्या जाहिराती बघताना असे वाटते की, कोरोना काळातील भयावह अवस्थेतून गेल्यानंतर आपण काहीच शिकलो नाही. प्राचीन भारतीय आयुर्वेदाचा प्रसार करण्याच्या नावाखाली अवास्तव दावे करणाऱ्या 'पतंजली'चे संस्थापक संचालक बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी मंगळवारी कडक मात्रेचे वळसे दिले. कोरोना काळातदेखील त्यांनी आपल्या औषधांचा प्रचार करताना तारतम्य ठेवले नाही. एवढेच नव्हे तर, लोपथी म्हणजेच आधुनिक वैद्यकशास्त्रातील औषधांबाबत दिशाभूल करणारी विधाने केली असा ठपका या लोकांवर ठेवण्यात आला आहे. योग आणि आयुर्वेद हा भारतीय संस्कृती किंवा परंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. कुठल्याही भारतीय व्यक्तीस अभिमान वाटावा अशी योगविद्येची देणगी आपल्याच देशाने साऱ्या जगाला दिली. भारतीय जीवनशैलीत आयुर्वेदाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आयुर्वेद उपचार पद्धतीचा अवलंब करणारी किंवा तिचा प्रसार करणारी अनेक केंद्रे वा संस्था भारतभर पसरलेल्या आहेत. भारतातच नव्हे तर जगातही अनेक ठिकाणी संशोधन होत आहे. तथापि, आयुर्वेदाचे श्रेष्ठत्व पटवून देण्यासाठी इतर उपचार पद्धतींबद्दल बेधडक आणि अज्ञानमूलक विधाने करणे हे अंतिमत: समाजासाठी घातक ठरते. आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार व्हायला हवा हे कोणीच नाकारणार नाही, परंतु त्यासाठी लोपथीसारख्या प्रगत औषधशास्त्राबद्दल वाटेल ती माहिती पसरवणे खचितच समर्थनीय नाही. नेमकी हीच बाब सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी अधोरेखित केली. मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा अशा विकार-व्याधींवर कायमचा उपाय अशी जाहिरात करत संशयास्पद उत्पादने बाजारात विकणे आजही सुरू आहे. रक्तदाब, मधुमेह हे जीवनशैलीशी संबंधित रोग आहेत. त्यांच्यावर नियंत्रण नसेल तर त्याचे पर्यवसान जीवघेणे ठरू शकते. जीवनशैलीशी संबंधित असलेल्या या विकारांची जणु साथ सध्या आली आहे. आधुनिक वैद्यकशास्त्र त्यावर उपाययोजना शोधण्यात गुंतले आहे. हा फैलाव घाबरवणारा असताना आपले औषध हाच अंतिम उपाय असे सांगणाऱ्या कंपन्यांविरोधात 'इंडियन मेडिकल असोसिएशन'ने (आयएमए) आक्षेप नोंदवणारी मोहीम सुरू केली. या मोहिमेंतर्गत भारतीय औषध कायद्यातील तरतुदींनुसार न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यात आले. असल्या प्रकारच्या जाहिरातींमध्ये सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त करून सर्वोच्च न्यायालयाने काही मुदत देखील दिली होती, परंतु कुठल्याही कंपनीने आपल्या जाहिरातीत बदल केला नाही. एका सुप्रसिद्ध ब्रँडच्या टूथपेस्टच्या जाहिरातीत असेच भलतेच दावे असल्याचा आरोप मध्यंतरी झाला होता. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. सर्वसामान्य जनता खोट्या प्रचाराला बळी पडू नये म्हणून १९५४ साली अतिरंजित जाहिरातींच्या बाबत कायदा करण्यात आला होता. हा कायदा जेव्हा झाला, तेव्हा समांतर औषधोपचार पद्धतींबद्दल पुरेसे संशोधन झाले नव्हते, परंतु जगभर औषध विक्रीबाबतचे निर्बंध अधिकाधिक कडक होत असताना भारतातील या संदर्भातील धोरण थोडे सैलसरच दिसते ही निश्चितच चिंतेची बाब आहे. जनसामान्यांनी आपल्या भरवशाच्या डॉक्टरने शिफारस केलेली औषधेच तेवढी घ्यावीत, जाहिरातींना बळी पडू नये एवढेच आवाहन करावेसे वाटते. अन्यथा रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती ओढवू शकते.**

# अलिबाग जिल्हा रुग्णालयाचे 'आरोग्य' सुधारतेय!

खबरबात
प्रकाश सोनवडेकर



गेली कित्येक वर्षे अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात डॉक्टर नव्हते. काही सुविधा नव्हत्या. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना साध्या आजारावर उपचार करण्यासाठी खासगी रुग्णालयात जावे लागत होते. अलिबाग येथील खासगी रुग्णालयांमध्ये उपचार न झाल्यास रुग्णांना मुंबई किंवा पुणे येथे जावे लागत होते. रुग्णालयात सुविधा नसल्यामुळे जिल्हा रुग्णालयाचे आरोग्यच बिघडले होते, परंतु मागील वर्षभरात या रुग्णलायात डॉक्टर आल्यामुळे उपचार होऊ लागले आहेत. इतकेच नव्हे तर शस्त्रक्रियादेखील केल्या जात आहेत.

जिल्हा शासकीय रुग्णालयात वर्षभरात गंभीर आणि सामान्य अशा एकूण तीन हजार ६२५ यशस्वी शस्त्रक्रिया निष्णात डॉक्टरांनी केल्या आहेत. नवीन शल्यचिकित्सक आल्यामुळे जिल्हा रुग्णालयात सुविधा उपलब्ध झाल्या. रुग्णालयाचे आरोग्य सुधारले. जर एखादा अधिकारी सकारात्मक विचाराचा असले तर तो काय करू शकतो याचे हे उदाहरण आहे.

अलिबाग येथे २७२ बेडचे जिल्हा शासकीय रुग्णालय आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातून रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयात येतात, परंतु डॉक्टरच नसल्यामुळे त्यांच्यावर उपचार होत नव्हते. डॉक्टर्स नसल्यामुळे हे रुग्णालयाच आजारी पडले आहे. फिजीशिअन, सर्जन, कान नाक घसा तज्ज्ञ, रेडीऑलॉजिस्ट, दंतचिकीत्सक यासारखे तज्ज्ञ डॉक्टर रुग्णालयात उपलब्ध नाहीत, त्यामुळे रुग्णांवर उपचार होत नाहीत. शस्त्रक्रीयादेखील होऊ शकत नव्हत्या. स्कॅन्सर, आतड्यांचे आजार, पित्ताशय यासह गंभीर आजार असलेल्या रुग्णाला यापूर्वी खासगी रुग्णालयात किंवा मुंबईला जाऊन शस्त्रक्रिया करून आजारावर उपचार करावे लागत होते. त्यामुळे रुग्णाला शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक भार सोसावा लागत होता. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याच्या विधानसभेतदेखील आवाज उठवला होता.

यानंतर मात्र जिल्हा रुग्णालयात सुविधा उपलब्ध झाल्या. गंभीर तसेच सामान्य शस्त्रक्रिया निष्णात डॉक्टर रुग्णालयातच करू लागले आहेत. जिल्हा शासकीय रुग्णालयात वर्षभरात २२९९ गंभीर तर १३२६ सामान्य अशा तीन हजार ६२५ यशस्वी शस्त्रक्रिया करून रुग्णांना जीवनदान दिले आहे. जिल्हा रुग्णालयात गंभीर आजारावरील शस्त्रक्रिया मोफत होऊ लागल्याने सर्व सामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता विविध आजारावरील तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध झाले आहेत. विविध शस्त्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे गंभीर आजारावरील शस्त्रक्रिया करणे सोपे झाले आहे.

यापूर्वी जिल्हा रुग्णालयात सुविधा नव्हत्या. अनेक पद रिक्त होती. यंत्र होती परंतु तंत्रज्ञ नव्हते. त्यामुळे ही यंत्र पडून होती. डॉ अंबादास देवमाने यांनी जिल्हा शल्यचिकित्सक पदाची जबाबदारी स्वीकारल्या नंतर बदल दिसू लागले. त्यांनी पाठपुरावा करून तज्ज्ञ डॉक्टरांची पद भरली. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली सेवा मिळू लागली आहे.

गेल्या वर्षभरात एक लाख २७ हजार ३९० बाह्यरुग्ण तपासणी करण्यात आली. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या आर्थिक वर्षात सामान्य प्रकारात २२८ गंभीर, ४५५ सामान्य, स्त्री रोगाच्या गंभीर १९३७, सामान्य १४२, तर अर्थो प्रकारात १३४ गंभीर, ७२९ सामान्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे अनेकांना जीवदान मिळाले आहे.

जिल्हा शासकीय रुग्णालयात चांगले उपचार मिळू लागलेत. काही आजारावरील शस्त्रक्रिया जाता जिल्हा शासकीय रुग्णालयात मोफत होत आहेत. मुंबईमध्ये जाऊन किंवा खासगी रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया करण्याचा खर्च टळत आहे. जिल्हा रूग्णालयात चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हे शक्य होत आहे. रुग्णावर उपचार करणाऱ्या जिल्हा रुग्णालयाचे आरोग्य बिघडले होते ते सुधारले आहे. जिल्ह्यातील रुग्णासाठी ही चांगली बाब आहे.

# अल्पावधीतच अभिनयाची छाप सोडणारी दिव्या भारती



दिव्या भारती ही एक भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री होती जिने प्रामुख्याने हिंदी आणि तेलुगु चित्रपटांमध्ये काम केले. ती तिचा अभिनय, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि सौंदर्यासाठी ओळखली जाणारी तसेच त्याकाळातील सर्वांत लोकप्रिय आणि सर्वाधिक मानधन घेणारी भारतीय अभिनेत्री होती.

भारतीने आपल्या अभिनयाच्या कारकिर्दीची सुरुवात किशोरवयात केली होती. तेव्हा ती पिन-अप मॉडेलिंग असाइनमेंट करत होती. तिने सर्वप्रथम तेलुगू भाषेतील साहसी प्रणयपट 'बॉबिली राजा' (१९९०) मध्ये वेंकटेश सोबत मुख्य भूमिकेतून भारतीय चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर आर्थिकदृष्ट्या अयशस्वी ठरलेल्या तामिळ भाषेतील 'निला पेन्ने' (१९९०) चित्रपटात तिने दुसरी भूमिका केली. 'ना इलेना स्वर्गम' (१९९१) आणि 'असेंब्ली राउडी' (१९९१) या दोन तेलुगू चित्रपटांमध्ये तिने छोट्या भूमिका केल्या होत्या. भारतीला तिचे पहिले व्यावसायिक यश तेलुगू विनोदी प्रणयपट 'राउडी अल्लुडू' (१९९१) मध्ये मिळाले.

तेलुगू चित्रपटांमध्ये काम केल्यानंतर, तिने १९९२ मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि हिंदी साहसपट 'विश्वात्मा' (१९९२)द्वारे तिच्या बॉलीवूड मधील अभिनयाच्या कारकिर्दीस सुरुवात केली. १९९२मध्ये आलेला हिंदी चित्रपट 'शोला और शबनम' हा बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आणि तिच्या कारकिर्दीत एक मैलाचा दगड ठरला. तिने 'दीवाना' या प्रणयपटात भूमिका करून स्वतःला सिद्ध केले. या भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट महिला पदार्पणाचा फिल्मफेर पुरस्कार मिळाला.

दिव्या भारतीचा ५ एप्रिल १९९३ रोजी, वयाच्या १९ व्या वर्षी, मुंबईतील तिच्या अपार्टमेंटच्या बाल्कनीतून पडून मृत्यू झाला. तिच्या मृत्यूच्या काही काळ आधी, तिने रंग आणि शतरंजचे चित्रीकरण पूर्ण केले होते; हे अनुक्रमे ७ जुलै १९९३ आणि १७ डिसेंबर १९९३ रोजी मरणोत्तर प्रसिद्ध झाले आणि त्यांना मध्यम यश मिळाले.४२४३ तिने दोन्ही चित्रपटांसाठी तिच्या दृश्यांचे चित्रीकरण पूर्ण केले असले तरी, डबिंग कलाकाराचा वापर करण्यात आला कारण तिला चित्रपटांसाठी डब करण्याची संधी मिळाली नाही. तिचा अपूर्ण तेलुगू चित्रपट थोली मुद्दू हा अभिनेत्री रंभाने अंशतः पूर्ण केला होता, जी भारतीसारखीच होती आणि त्यामुळे तिचे उर्वरित दृश्ये पूर्ण करण्यासाठी तिचा बॉडी डबल म्हणून वापर करण्यात आला. हा चित्रपट ऑक्टोबर १९९३ मध्ये प्रदर्शित झाला.

५ एप्रिल १९९३ रोजी संध्याकाळी उशिरा, भारती बॉम्बेमधील वर्सोवा, अंधेरी पश्चिम येथील तुलसी बिल्डिंगसमधील तिच्या पाचव्या मजल्यावरील अपार्टमेंटच्या बाल्कनीच्या खिडकीतून पडली. ती १९ वर्षांची होती. तिच्या मृत्यूचे अधिकृत कारण डोक्याला गंभीर दुखापत आणि अंतर्गत रक्तस्त्राव हे होते. ७ एप्रिल १९९३ रोजी मुंबईतील विलेपार्ले स्मशानभूमीत तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**(साभार : इंटरनेट)**




## गुगलची 'ही' सेवा होणार बंद; डेटा करा ट्रान्सफर

ऑफिसपासून ते कामाच्या संदर्भात महत्त्वाचा डेटा साठविण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत आपण गुगलचा वापर करतो. याच गुगलच्या सेवेच्या माध्यमातून आपली अनेक कामे सहज शक्य होतात. अशातच कंपनी आपली एक महत्त्वाची सेवा बंद करणार आहे. तुम्हीही या सेवेचा लाभ घेत असाल तर तुमचा जो काही डेटा आहे तो तात्काळ सेव्ह करायला घ्या. अन्यथा तुमच्या महत्त्वाच्या फाईल्स डिलीट होतील. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, गुगलची नेमकी कोणती सेवा बंद होणार आहे? तर, तुमच्या माहितीसाठी गुगलने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्येच आपली पॉडकास्ट सेवा बंद करण्याची घोषणा केली होती.



याबाबत गुगलने सांगितले होते की, जर तुम्ही पॉडकास्ट वापरत असाल आणि तुमच्या पॉडकास्टमध्ये महत्त्वाचा डेटा असेल तर तुम्ही तो ताबडतोब यूट्यूब म्युझिकमध्ये ट्रान्सफर करा. त्याचे यूजर्स जुलै २०२४ पर्यंत सदस्यत्व ट्रान्सफर करू शकतील. तुम्ही डेटा ट्रान्सफर केल्यास, काही वेळ लागू शकतो. या वेळी तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की सर्व पॉडकास्ट YouTube Music वर हस्तांतरित होणार नाहीत. जे पॉडकास्ट ट्रान्सफर केले जाऊ शकत नाहीत, त्यावर तुम्हाला Content is Unavailable असे लिहिलेले दिसेल.

गुगलने हळूहळू पॉडकास्टचे फीचर्स यूट्यूब म्युझिकसह इंटीग्रेट करण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेत यूट्यूब म्युझिक आणि पॉडकास्ट एकाच पमध्ये दिसू लागले आहेत. लवकरच इतर देशांमध्ये सुद्धा ही सेवा पुरवली जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, Google Podcast चा वापर जगभरात ५० कोटींहून अधिक लोकांनी केला आहे. हे ॲप यूजर्सने डाऊनलोड केलं आहे. खरंतर, पॉडकास्टचे फीचर Google YouTube Music मध्ये देखील जोडले जात आहे, ज्यामध्ये RSS फीड देखील समाविष्ट आहे.

**डेटा कसा ट्रान्सफर करायचा?**

यासाठी सर्वांत आधी तुम्हाला गुगल पॉडकास्ट पला भेट द्यावी लागेल. या ठिकाणी तुम्हाला स्क्रीनच्या टॉपला एक्सपोर्ट सबस्क्रिप्शन हा पर्याय दिसेल तो तुम्हाला निवडायचा आहे. यानंतर, तुम्हाला एक्सपोर्ट टू यूट्यूब म्युझिकचा असा ऑप्शन दिसेल. यानंतर तुम्हाला Export हा पर्याय निवडायचा आहे आणि तो सुरु ठेवायचा आहे. तुम्हाला सबस्क्रिप्शन पाहायचं असल्यास, तुम्हाला ते Go To Library सापडेल.

# महिलांच्या उद्धारक पंडिता रमाबाई



निमित्त

पंडिता रमाबाई यांचा आज स्मृतिदिन. पंडिता रमाबाई म्हणजे स्त्रियांच्या-विशेषतः परित्यक्त्या, पतिता व विधवांच्या-सर्वांगीण उद्धाराकरिता समर्पित भावनेने कार्यरत राहिलेल्या महाराष्ट्रीय विदुषी होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी मंगलोरजवळ माळहेरंजी येथे राहणाऱ्या अंबाबाई आणि अनंतशास्त्री डोंगरे या दाम्पत्यापोटी झाला. अनंतशास्त्री हे त्या काळी स्त्रियांच्या बाबतीत पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांना शिक्षण द्यावे या मताचे ते होते. रमाबाईंना त्यांनी वेदादींचे शिक्षण दिले. तसेच रमाबाई नऊ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांचे लग्न करून दिले नाही म्हणून ज्ञातिबांधवांनी त्यांना वाळीत टाकले. आई-वडिलांना लोकांच्या त्रासामुळे सर्व मुलांना घेऊन तीर्थयात्रेला पायी निघावे लागले. या तीर्थयात्रेच्या १५-१६ वर्षांच्या कालखंडात रमाबाईंना आई-वडिलांपासून, विशेषतः आईकडून, संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले.

रमाबाईंनी संस्कृतमध्ये तर प्रावीण्य मिळविले होतेच; पण मराठी, हिंदी, बंगाली आणि कन्नड भाषाही त्या अस्खलितपणे बोलू शकत होत्या. १८७८ साली त्यांचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कोलकात्याला आल्या. तेथे मात्र त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला. कोलकात्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. 'पंडिता' नावाने ओळखल्या जाणार्या रमाबाई या आज एकमेव महिला होत.

बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले. बाल-विवाह, पुनर्विवाहास बंदी इ. घातक चालीरीती व दुष्ट रुढी यांतून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी प्रथम पुणे येथे व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. स्त्रीधर्मनीति (१८८२) हे पुस्तक त्यांनी लिहिले. अत्यंत बुद्धिवान असलेल्या रमाबाईंचे अंतःकरण अत्यंत उदार व दीनदुबळ्या स्त्रियांकरिता सतत तळमळणारे होते. अशा या महान समाजसेविकेचे ५ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले.

पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या संस्था :

१) आर्य महिला समाज, पुणे (१८८२) : या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांच्या स्थितीबद्दल जागृती केली.या संस्थेच्या शाखा अहमदनगर, सोलापूर, पंढरपूर, बार्शी, ठाणे, मुंबई येथे स्थापन.

२) रमाबाई असोसिएशन : १८८७ साली अमेरिकेतील बोस्टन शहरात रमाबाईंनी ही संस्था स्थापन केली.

३) शारदा सदन (शारदाश्रम), मुंबई : १८८९. या संस्थेमार्फत निराश्रित विधवा, अनाथ स्त्रियांच्या निवासभोजनाची व्यवस्था. १८९० मध्ये शारदा सनदचे पुणे येथे स्थलांतर व काही काळाने केडगाव येथे स्थलांतर. पुण्यात ही संस्था नावारूपास आली.शारदा सदनचे सल्लागार : न्या. रानडे, न्या. के. टी. तेलंग, डॉ. भांडारकर.

४) मुक्ती सदन, केडगाव : १८९६. या संस्थेमार्फत अनाथ, विधवा स्त्रियांचे शिक्षण, निवास-भोजनाची व्यवस्था.पतित स्त्रियांसाठी 'कृपा सदन', अंध विद्यार्थ्यांची पहिली शाळा 'बातमी सदन', अनाथ मुलांसाठी 'सदानंद सदन', प्रीति सदन, शांती सदन या पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या अन्य संस्था आहेत. अमेरिकेत त्यांनी बालोद्यान शिक्षण पद्धती शिकून घेतली. व्हॉईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या पत्नी लेडी डफरीन यांच्या नावे फंड सुरू करून स्त्रियांसाठी वैद्यकीय सोयी उपलब्ध करून दिल्या.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : काही शाळांच्या परीक्षा संपलेल्या असल्याने विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्ट्या पडलेल्या आहेत. त्यामुळे शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर मुले क्रिकेट खेळाचा सराव करताना दिसतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

## तज्ज्ञांच्या मते, हृदयाच्या आरोग्यासाठी व्यायाम हवा!

उत्तम आरोग्यासाठी व्यायाम आवश्यक असतो. हृदय, रक्तवाहिन्या तसंच मानसिक आरोग्यासाठी डॉक्टर नियमित व्यायामाचा सल्ला देतात. बहुतांश लोक फिटनेससाठी रोज व्यायाम करतात. एकूण आरोग्यासाठी मध्यम स्वरुपाचा व्यायाम फायदेशीर मानला जातो. पण जास्त व्यायाम केल्यास त्याचा हृदयाच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हृदयाचं कार्य चांगलं राहण्यासाठी संतुलित व्यायाम गरजेचा आहे. तीव्र स्वरुपाचा व्यायाम केल्यास कोणत्या समस्या उद्भवू शकतात, या विषयी मुंबईतील एशियन हार्ट इन्स्टिट्युटचे वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. संतोषकुमार डोरा यांनी मार्गदर्शन केलं आहे.



**१. व्यायामाची तीव्रता हळूहळू वाढवा :** व्यायामाची तीव्रता अचानक वाढवू नये. त्याऐवजी हळूहळू व्यायामाची तीव्रता वाढवा. यामुळे शरीर व्यायामाशी जुळवून घेईल आणि अतिश्रमामुळे निर्माण होणारे धोके टळू शकतील.

**२. तुमच्या शरीराचं ऐका :** सतत थकवा येणं, कार्यक्षमता कमी होणं किंवा विश्रांती घेताना हृदयाची गती वाढणं यासारख्या तीव्र व्यायामामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष द्या. तुम्हाला अशी लक्षणं जाणवत असतील तर विश्रांती घ्या आणि बरं होण्यासाठी पुरेसा वेळ द्या.

**३. व्यायाम आणि विश्रांतीचे दिवस यांचे नियोजन करा :** जास्त प्रमाणात व्यायाम करत असाल तर शरीराला आराम मिळावा यासाठी पुरेसा वेळ द्या. स्नायु, हॉर्मोनचं संतुलन आणि एकूणच हृदय, रक्तवाहिन्यांच्या आरोग्यासाठी पुरेशी विश्रांती आवश्यक आहे.

**४. संतुलित व्यायामाची दिनचर्या ठेवा :** तुमच्या दिनचर्येत वेगवेगळ्या प्रकारच्या व्यायामाचा समावेश करा. हृदय आणि सांध्यावरील ताण कमी करण्यासाठी स्ट्रेंथ ट्रेनिंग, स्नायुंत लवचिकता आणणारे व्यायाम आणि हलक्या व्यायामासह हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी ॲक्टिव्हिटी एकत्रितपणे करा.

**५. हायड्रेटेड रहा :** हृदय आणि रक्तवाहिन्यांचं कार्य सुरळीत राहण्यासाठी योग्य हायड्रेशन गरजेचं आहे. पुरेसं द्रव संतुलन राहावं यासाठी व्यायाम सुरू करण्यापूर्वी, व्यायामादरम्यान आणि व्यायामानंतर पुरेसं पाणी प्या.

**६. सूचक इशाऱ्यांकडे लक्ष द्या :** जर तुम्हाला छातीत दुखणं, धडधडणं, श्वासोच्छवासाचा तीव्र त्रास किंवा व्यायामादरम्यान अथवा नंतर चक्कर आल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या. या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. त्यामुळे व्यायामाला सुरुवात करण्यापूर्वी किंवा त्यात बदल करण्याअगोदर तज्ज्ञ हेल्थकेअर प्रोव्हायडरचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

# महाडच्या आंबिवली धरणात मगरीची दहशत

## वावर वाढल्याने नागरिकांसह जनावरांना धोका

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील आंबिवली धरणामध्ये असलेल्या मगरीमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

तालुक्यातील शिरवली गावाजवळ आंबिवली धरणाचा काही भाग आहे. या धरणाच्या काठावरच शिरवली मोहल्ला आणि गाव आहे. या गावातील नागरिकांचे याठिकाणी सातत्याने ये-जा सुरू असते. दैनंदिन वापरासाठी पाण्याचा वापरदेखील येथूनच होतो. जनावरेदेखील याच धरणाच्या पाण्यावर पाणी पिण्यासाठी जात असतात, मात्र गेल्या काही महिन्यांपासून या ठिकाणी असलेल्या मगरीमुळे एकच दहशत निर्माण झाली आहे. पाणी पिण्यास जाणाऱ्या कुत्र्यांना या मगरीने लक्ष केले असून आतापर्यंत पाच ते सहा कुत्रे या मगरीने फस्त केल्याचे नागरिकांनी सांगितले.



दुपारच्या सुमारास ही मगर काठावर बसलेली असते. याच सुमारास कपडे धुण्यासाठी जाणाऱ्या महिला, पाणी पिण्यासाठी जाणारी जनावरे यांचा वावर असतो, मात्र मगर दिसू लागल्याने या नागरिकांनी धास्ती घेतली आहे. सुमारे तीन ते चार फूट लांबीची ही मगर असून या मगरीला ताब्यात घेऊन तिला सुरक्षित ठिकाणी सोडण्यात यावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

> **गेले काही महिने ही मगर या ठिकाणी दिसून येत आहे. कपडे धुण्यासाठी जाणाऱ्या महिला मगरीमुळे दहशतीच्या छायेखाली आहेत. महाड वन विभागाने या मगरीला पकडून सुरक्षित स्थळी सोडून द्यावे.**
> **-युसूफ पोशिलकर, ग्रामस्थ**

# माणगावमध्ये कासवाच्या पिल्लाला जीवदान

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगावजवळील रिळे-पाचोळे येथील एका कासवाच्या पिल्लाला जवळील नदीपात्रात सोडून जीवदान देण्यात आले. माऊली गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य कृष्णा दिवेकर यांना हे कासवाचे पिल्लू आढळले होते. या पिल्लाची अवस्था अत्यंत नाजूक झाली होती. त्याला चालताही येत नव्हते. त्यामुळे गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी अखेर या कासवाला जवळील नदीपात्रामध्ये सोडले. या वेळी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवारदेखील उपस्थित होते.

कासव हा निसर्ग साखळीतला महत्त्वाचा घटक आहे, मात्र सध्या कासवांची पैशांसाठी तस्करी केली जाते, हे चुकीचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या जीवांचे रक्षण करणे गरजेचे असल्याचे ग्रुपच्या सदस्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे धानसर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

-मिळकतीचे वर्णन-

**मौजे धानसर, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| धानसर | अर्जुन रामा पाटील | १११ | ०.१६ | ३.०५ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/ तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०४/२०२४

**सही/-**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
(BA LL.B)

पत्ता - श्री. हरे कृष्णा को.ऑप.सोसा. प्लॉट नं. १२, सेक्टर ५, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. ९६९९४९९९६३



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे बेलवली, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार १. पार्वती बाळाराम मेढेकर २. उमेश बाळाराम मेढेकर ३. रमेश बाळाराम मेढेकर ४. सविता मनोज कोळेकर, राहणारः बेलवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून आमचे अशिलानी योग्य ती परवानगी घेवुन कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे बेलवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | आकार |
| | | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू.पै |
| ४३/३/अ | २ | ०-४०-७० | ०-०३-०० | ०-४३-७० | ८.२५ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार,फरोक्त,पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/०४/२०२४

**सही/ -**
ॲड. स्वप्निल व्यं जाधव
बी.ए., एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल )

कार्यालयीन पत्ता : बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६


# पेण नगर परिषदेची विक्रमी कर वसुली

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ११ कोटी ९४ लक्ष रुपये मालमत्ता करापैकी १० कोटी ९१ लक्ष रुपये (९१ टक्के) इतकी वसुली झाली आहे. मालमत्ता कराची ही विक्रमी वसुली असल्याचे वसुली विभाग प्रमुख महेश वडके यांनी सांगितले.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात नगर परिषदेत महायुएलबी ही नवीन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली होती. या संगणक प्रणालीचा वेग अत्यंत संथ होता, तसेच तांत्रिक अडचणी येत होत्या.



संथगतीने चालणारी संगणक प्रणाली, अपुरा कर्मचारी वर्ग, निवडणूक कामे आदी अडचणी असतानादेखील मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या आदेशाने आणि लेखापाल व लेखापरिक्षक किरण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कर निरीक्षक गोविंद भिसे, वसुली विभागप्रमुख महेश वडके, संगणक अभियंता निकिता पाटील, गटप्रमुख विश्वनाथ गायकवाड, संजय पाटील, महेंद्र गाडेकर, मधुकर ठाकूर, तसेच संदीप पाटील, प्रवीण बैंकर, विलास लिमये, दीपक हजारे, विवेक सावंत, शिवानी नाक्ती, दर्शना ठाकूर, ज्योत्स्ना पाटील, सुरेखा गुरव, पायल पाटील, यश बांदिवडेकर, ओंकार लोखंडे आदींनी कर वसुलीची मोहीम अथकपणे राबवली.

मालमत्ता कराची विक्रमी वसुली केल्याबद्दल मुख्याधिकारी पाटील यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

## माणगाव येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन १० एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत करण्यात आले आहे. शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरजूंनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल टीम परिश्रम घेत आहेत.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**रायगड : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीच्या नियमांचे भंग करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.३) एकूण २८३ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून दोन लाख आठ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## कुत्र्यावरून दोन गटांत हाणामारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पाळीव कुत्र्यावरून दोन गटात हाणामारी झाली. त्यामध्ये दोन्ही गटातील जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी सायंकाळी वरंडेपाडा येथे घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात एकमेकांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वरंडेपाडा येथील पहिल्या फिर्यादी महिलेची कोंबडी शेजारच्या पाळीव कुत्र्याने पकडली होती. त्यावरून फिर्यादीच्या नातेवाईकांनी दगड मारून त्या कुत्र्याला हाकलून दिले. यावरून आरोपी व फिर्यादीमध्ये शाब्दीक वाद झाले. रागाच्या भरात आरोपीने फिर्यादीला काठीने मारहाण केले तसेच त्यांचे पती व अन्य दोन जणांनीदेखील दांडक्याने मारहाण करून जखमी केले, तसेच दुसऱ्या फिर्यादी त्यांचा कुत्रा आणण्यासाठी गेले होते. त्या वेळी आरोपीने काठीने फिर्यादी यांच्या नातेवाईकाला मारहाण केली. या प्रकरणी पोलीस नाईक गव्हाणे, पोलीस नाईक सचिन वाघमारे अधिक तपास करीत आहेत.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030404**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-71/2023 - 2024.**<br>RFx e-tender for supply of Portable Heavy Duty Hydraulic Crimping Tool at 220/33-22kV ONGC Substation and 100kV Thal Substation under EHV (O&M) Division Panvel…**3rd call.**<br>**Tender amount Rs. 4,91,270/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.04.2024, 18:00 Hrs. to 11.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 11.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **12.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**

## - TENDER NOTICE -

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Construction Of Science Annexture Building (Gr.Fl.Part I Library)

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site https://edumart.sets.co.in from 05-04-2024 and Tender must be submitted online to this website up to 11-04-2024 @ 5.00 pm. For more details contact :- Principal , Dr. P.G. Pawar Mobile No. 8928663853

**Details are as follows-**

| Work | Construction Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| College Science Annexture Building (Ground Fl. Phase I Library) | 328.127 sqm (3532 sft) | 92,40,000/- | Rs. 92000/- | Rs. 5000/- |

**sd/-**
**Principal,**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**



**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**

## - TENDER NOTICE -

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the interior work Of Chemistry Research Laboratary

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site https://edumart.sets.co.in from 05-04-2024 and Tender must be submitted online to this website up to 11-04-2024 @ 5.00 pm. For more details contact :- Principal , Dr. P.G. Pawar Mobile No. 8928663853

**Details are as follows-**

| Work | Construction Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| Interior Work Of Chemistry Research Lab. | 72 sqm (775 sft) | 20,18,000/- | Rs. 20000/- | Rs. 1000/- |

**sd/-**
**Principal,**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**



## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

**ता. पनवेल, जि. रायगड**

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**मार्च २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | ललितकुमार गुरुनाथ नरे/ ज्योत्स्ना ललितकुमार नरे | संदीप कमलाकर देसाई/ साक्षी संदीप देसाई | पवल५-११५१४-२०१८ | २१/१०/२०१८ | सदनिका नं. ई २०१, दुसरा मजला, कार्तिक्य पार्क को.हौ.सो.,बि.नं.२, मोजे शिलोत्तर रायचूर |
| २ | हरेश दत्ताराम आमकर/ श्वेता दिलीप रोकडे | मे.आगा रियल्टी तर्फे तौसिफ जलालुद्दीन आगा | पवल२-१५१३५-२०२३ | ३१/८/२०२३ | सदनिका नं.००५,तळ मजला, ओम साई रेजन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३ | मनोज बाबूराव देशमुख/ श्वेता मनोज देशमुख | भालचंद्र रमाकांम धरणगुत्ती | पवल१-१४१९-२०२४ | २९/०२/२०२४ | सदनिका नं. ए १०९, पहिला मजला, ए विंग, गंगा दर्शन को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ४ | जॉनसन कुंजकुट्टी | रहेलम्मा कुंजकुट्टी/सोसम्मा के वाईफ ऑफ मॅथीव जेकब यांच्य तर्फे कु.मु.जॉनसन कुंजकुट्टी | पवल५-४७२६-२०२३ | २३/०३/२०२४ | सदनिका नं. ए ०२, तळ मजला, साक्षी पार्क को.हौ.सो.,बी टाईप, ३ बी, मौजे पालीदेवद |
| ५ | अमृता श्रीपाद कवळे/ श्रीपाद आनंद कवळे | साईनाथ चंद्रकांत खटावकर | पवल२-४१८१-२०२४ | २८/०२/२०२४ | सदनिका नं.०२, तळ मजला, डी विंग, समृद्धभूमी को.हौ.सो.,मौजे पालरदेवद |
| ६ | संकेत महादेव थोरात/ महादेव बाबूराच थोराप/ चंद्रकांत महादेव थोरात | प्रशांत गजानन दळवी/ आयुशी प्रशांत दळवी | पवल२-४३८४-२०२४ | १/३/२०२४ | सदनिका नं. १०२, पहिला मजला, एफ विंग बि.नं.४, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | सचिन श्रीधर दाभाडे/ विशाखा सचिन दाभार्ड | प्रदीप वासुदेव नायर/ दर्शना नायर | पवल२-४६२३-२०२४ | ५/३/२०२४ | सदनिका नं.३०१, तिसरा मजला, सी विंग निम्बेश्वर पार्वती को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| ८ | एकनाथ लक्ष्मण खेमनर | सुनील लक्ष्मण खेमनर | पवल१-१६६०-२०२४ | ११/३/२०२४ | सदनिका नं.४०३, चौथा मजला, ई विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ९ | मनोजकुमार मधुकर पाटील/ वैशाली मनोजकुमार पाटील | गणेश विजय मोरे | पवल२-४८८२-२०२४ | ६/३/२०२४ | सदनिका नं.२०२,दुसरा मजला, अस्मिता को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १० | गणेश शांताराम सोनार | अरुण नामदेव लंके | पवल२-१७४३९-२०२३ | ९/१०/२०२३ | सदनिका नं.बी २०१,दुसरा मजला, टाईप १, साक्षी पार्क को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ११ | अशोक अनंत नागावकर | महेश रामचंद्र साळुंके | पवल२-५०५३-२०२४ | ११/३/२०२४ | सदनिका नं.२००७,जे विंग, फेज १, विसावा मजला, जरना को.हौ.सो.,बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १२ | साताप्पा मारुती चव्हाण/ तेजल साताप्पा चव्हाण | मालन यशवंत घुटूगडे | पवल२-२८७६-२०२४ | १२/२/२०२४ | सदनिका नं.ए १०३,पहिला मजला, कपिश अपार्टमेंट को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| १३ | शर्मिष्ठा किरण मोहिते/ किरण सावळाराम मोहिते | लिला नारायण म्हसकर | पवल२-२१८९०-२०२३ | १३/१२/२०२३ | सदनिका नं.४१०, चौथा मजला, ओमकार रेसिडेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १४ | हेमंत गोविंद सावंत/ हर्षला हेमंत सावंत | कल्पना नरेश ठाकूर | पवल२-१८२६६-२०२३ | १९/१०/२०२३ | सदनिका नं.४०१, चौथा मजला, ओमकार रेसिडेन्सी, मोजे शिलोत्तर रायचूर |
| १५ | अमिना सौकत नदाफ | सौकत दाउद नदाफ | पवल२-४२४८-२०२४ | २९/०२/२०२४ | सदनिका क्र.२०२, दुसरा मजला,बि.नं.ए, ओमशक्ती कॉम्प्लेक्स, ओमकार स्वरुप को. हौ.सो., मौजे पालदेवद |
| १६ | नागेंद्र यादव / निशा राय | मे.आयकॉन स्पेस डेव्हलपर्स तर्फे श्री.राजेश यादव | पवल२-३४६२-२०२४ | १६/०२/२०२४ | सदनिका क्र.१०२, पहिला मजला,बि.नं.५, डी विंग, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १७ | प्रगती प्रभाकर तांबोळी | श्रेया संतोष जाधव/ संतोष राजाराम जाधव | पवल१-२२३९-२०२३ | १०/३/२०२३ | सदनिका क्र.सी २०४, दुसरा मजला, जम्नोत्री सागर को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर |
| १८ | अहमद मुबारक इनामदार/ फैमिदा अहमद इनामदार | राहिल अजीज निगुडकर/ सारा राहिल निगुडकर | पवल२-३५३९-२०२४ | २१/२/२०२४ | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, ओम साई रेजन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | श्वेता अभयकुमार गायकवाड /अभयकुमार सिताराम गायकवाड | के.राजगोपाल रामचंद्रन पिल्ले/अभिजीत राजगोपाल पिल्ले | पवल२-५७५४-२०२४ | १९/३/२०२४ | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, बि.नं.३ बी विंग, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| २० | नाहरसिंह मुलसिंह खरवड /छगुडी नाहारसिंह खरवड | नागेश हिरु पोपेटा | पवल२-१७५८७-२०२१ | २०/१२/२०२१ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, सरस्वती निवास, मिळकत क्र.५४ मोजे शिलोत्तर रायचूर |
| २१ | आर. सेयान अयंगार | एस. गौरीशंकर/ब्रगधा सुब्रमनियम | पवल१-७७६७-२०१९ | २९/०८/२०१९ | सदनिका क्र. डी ०४, तळ मजला, बि.नं.२, साक्षी पार्क २, को.हौ.सो.मोजे शिलोत्तर रायचूर |
| २२ | प्रसाद प्रभाकर पिंगळे/ शितल प्रसाद पिंगळे | लीना नारायण म्हसकर | पवल२-६२२७-२०२४ | २४/३/२०२४ | सदनिका नं.४१२, चौथा मजला, ओंकर रेसिडेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २३ | महेंद्र महादेव पवार | महादेव माया पवार यांच्या तर्फे श्रीमती मनिषा महादेव पवार | २८५९ | ५/३/२०२४ | ग्रा.पं.घर मिळकत क्र.५७/१ तळ मजला, ५७/२ पहिला मजला व ६४/३, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २४ | मंगेश महादेव पवार | महादेव माया पवार यांच्या तर्फे श्रीमती मनिषा महादेव पवार | २८५९ | ५/३/२०२४ | ग्रा.पं.घर मिळकत क्र.५७/३ दुसरा मजला, ५७/४ तिसरा मौजे शिलोत्तर रायचूर |
| २५ | इंदिरा सदानंद कामथ | कै. सदानंद व्ही कामथ | ६६८/३ | ११/३/२०२४ | सदनिका क्र.१०४, बि.नं.१, श्रद्धा संकुल को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# नवी मुंबईत बोगस स्टॉल वाढले

## चौकशी करण्याचे आयुक्तांचे आश्वासन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेकडून पात्र दिव्यांग नागरिकांना स्वयंरोजगार मिळावा त्यासाठी पालिका स्टॉल विनामूल्य वितरित करत असते. हे स्टॉल विशिष्ट रंगाचे असतात ही वस्तुस्थिती असतानादेखील मनपाच्या हद्दीतील विविध भागात पालिकेचा संदर्भ देत पालिकेने निर्गमित केलेल्या स्टॉल पेक्षा वेगळा रंग असलेले स्टॉल नेरूळसह शहरातील पदपथावर दिसत असल्याचे पहायला मिळत आहेत. त्यामुळे नवी मुंबई मनपाच्या नावाखाली पालिका क्षेत्रात बोगस स्टॉल कार्यान्वित झालेत का, अशा प्रकारचा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

नवी मुंबई पालिका कडून यशस्वी ३३० दिव्यांग घटकांना स्टॉल वितरित करण्यात येत आहेत. त्यासाठी पालिकेने सिडकोकडून ऐरोली ते बेलापूरदरम्यान १४ भूखंड विकत घेतले. या ठिकाणी दिव्यांग नागरिकांना स्टॉल व्यवसाय करण्यासाठी दिले जाणार आहेत. स्टॉलचे वितरण मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागेवर द्यावेत, परंतु वाहतुकीचा प्रश्न, पादचाऱ्यांना



त्रास होऊ नये. यासाठी दिव्यांग नागरिकांसाठी खास भूखंड घेऊन त्यावर त्यांना व्यवसाय करावा लागणार आहे, परंतु मनपाच्या स्टॉल पेक्षा नव्याने शहरभर असलेल्या स्टॉल चालकांनी मात्र शहरातील मोक्याची ठिकाणे शोधून त्यावर व्यवसाय करण्याचा चंग बांधला असल्याचे एकंदरीत परिस्थिती वरून स्पष्ट होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नवी मुंबई पालिकेने पहिल्यांदा वितरित केलेले स्टॉल हे पिवळ्या रंगाचे आहेत तर शहरातील काही भागात पदपथ, मोकळ्या जागेवर असलेले स्टॉल हे निळ्या रंगाचे आहेत. त्यावर मनपाकडून सर्व्हे केल्याचा क्रमांकदेखील प्रसिध्द केला आहे. त्या अनुषंगाने खरोखरच पालिकेने निळ्या रंगाचे स्टॉल वितरित केले आहेत का? याचा शोध घेण्याची मागणी केली जात आहे.

> **नवी मुंबई महापालिका शहरातील नियम आणि शर्तीमध्ये पात्र असलेल्या दिव्यांग व्यक्तिनी स्टॉल वितरित करते. ते स्टॉल पिवळ्या रंगाचे आहेत की अन्य रंगाचे आहेत. त्या विषयी चौकशी केली जाईल. त्या नंतर पुढील कारवाई केली जाईल.**
>
> **–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई मनपा**

### पदपथावर अवैधरित्या बस्तान

नवी मुंबई पालिका क्षेत्रात फक्त मालमत्ता विभागच अशा प्रकारचे स्टॉल वितरित करते. आता जे स्टॉल वितरित करण्यात येत आहेत. ते साधारणत तीस वर्षांनी पहिल्यांदा स्टॉल वितरित करण्यात येत आहेत. या पूर्वी सिडकोचा कारभार होता. त्यावेळी त्यांनी स्टॉल वितरित केले होते. त्यांची संख्या फक्त १८८ इतकी होती. आता त्यामध्ये पालिकेकडून वितरित होणाऱ्या ३३० स्टॉलचा समावेश आहे. त्यामुळे पदपथावर असलेले इतर कोणतेही स्टॉल हे अवैध असल्याचे बोलले जात आहे.

# दुचाकी अपघातात चालक ठार

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सर्कल येथून पनवेल येथे जाणाऱ्या तरुणांची भरधाव स्कुटी खांदा कॉलनी येथील उड्डाणपुलाच्या कठड्याला धडकल्याने झालेल्या अपघातात स्कुटीचालक तरुणाचा मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना खांदा कॉलनी येथे घडली. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव प्रवीण पळसमकर (वय २७) असे असून जखमी झालेल्या त्याच्या सहकाऱ्याचे नाव अविनाश जोगळे (वय २९) असे आहे. प्रवीण व अविनाश हे दोघेही नातेवाईक असून ते कळंबोली सर्कल येथून स्कुटीवरून पनवेल येथे जात होते.

### सहकारी जखमी




या वेळी प्रवीणला खांदा कॉलनी येथील ब्रिजवर चढताना अंधारामुळे पुलाचा कठडा निदर्शनास न आल्याने तो भरधाव वेगामध्ये कठड्यावर स्कुटीसह धडकला. त्यामुळे प्रवीण व त्याचा सहकारी अविनाश हे दोघेही गंभीर जखमी झाले.

प्रवीव आणि त्याचा सहकारी अविनाश या दोघांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रवीणचा रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला.

# सोमटणे येथे दुकानाशेजारी उभ्या गाडीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात वाहन चोरीच्या घटना वाढत आहेत. सोमटणे येथे दुकाना शेजारी उभी करून ठेवलेल्या महिंद्रा बोलेरो पिकअप गाडीची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

रफिक खान यांनी त्यांची १,६०,००० रुपये किमतीची सफेद रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी (एमएच ४६–ई ५४२३) ही दुकानाशेजारी उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांची आरोग्यसेवा गुणवत्ता वाढवा -आयुक्त

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून डॉ. कैलास शिंदे यांनी विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यास पहिल्या दिवसापासूनच सुरुवात केली असून त्यासोबतच क्षेत्रीय भेटींद्वारे प्रत्यक्ष पाहणीलाही सुरुवात केली आहे. या अनुषंगाने आयुक्तांनी बुधवारी (दि. ३) वाशी येथील महापालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयाला भेट देत तेथील कामकाजाचा बारकाईने आढावा घेतला व सुधारणेच्या दृष्टीने मौलिक सूचना केल्या.

महापालिकेच्या वाशी, नेरूळ व ऐरोली या तीन रुग्णालयांपैकी वाशी रुग्णालयामध्ये नागरिक सर्वाधिक संख्येने उपचारासाठी येत असतात. त्याठिकाणची दैनंदिन बाहयरुग्ण (ओपीडी) संख्याही अधिक आहे. त्या दृष्टीने तेथे नागरिकांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध असावे तसेच तेथील प्रदर्शनी भागात आरोग्यविषयक माहिती देणारे पोस्टर्स, डिजीटल फलक अशी आरोग्य सूचनांची प्रचारसाधने वाढवावीत असे निर्देश त्यांनी दिले. तळमजल्यासह तिन्ही मजल्यांवरील वैद्यकीय सेवांची पाहणी करताना तेथील हवा खेळती राहण्याच्या दृष्टीने तत्परतेने उपाययोजना कराव्यात तसेच अंतर्गत स्थापत्य व रंगरंगोटीची कामेही जलद करुन घ्यावीत असे निर्देश आयुक्तांनी दिले. रुग्णालयात येणाऱ्या व्यक्तीला



प्रसन्न वातावरण लाभावे यादृष्टीने कार्यवाही करण्याचे त्यांनी सूचित केले. त्याचप्रमाणे अंतर्गत स्वच्छतेवर अधिक लक्ष देण्याच्या सूचनाही दिल्या. रूग्णांना देण्यात येणाऱ्या भोजनाचा दर्जाही उत्तम राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले. रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांना औषधचिठ्ठी न देता रुग्णालयामार्फतच औषध पुरवठा करण्यात येतो. या प्रिस्क्रीप्शन फ्री सेवेची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल व याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त होणार नाही याची विशेष दक्षता घेण्याचे आयुक्तांनी निर्देश दिले.

उपचारासाठी येणाऱ्या रुग्णाचा केसपेपर काढण्यापासून ते आंतररुग्ण (आयपीडी) सेवा घेऊन तो बरा होऊन परत जाईपर्यंतच्या कार्यालयीन नोंदी डिजीटल स्वरुपात घेतल्या जाव्यात यादृष्टीने एचएमआयएस (हॉस्पिटल मॅनेजमेंट इंटिग्रेटेड सिस्टीम) प्रणाली अदययावत करण्याचे व पेपरलेस कामकाज करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले.

या वेळी त्यांच्यासमवेत वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, शहर अभियंता संजय देसाई, उपायुक्त योगेश कडुसकर, रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. रवींद्र म्हात्रे, कार्यकारी अभियंता अजय संख्ये, वैद्यकिय अधिकारी डॉ. अजय गडदे, वाशी विभाग अधिकारी सागर मोरे व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नवजात अतिदक्षता विभागाची पाहणी करताना तेथील बाळांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दूध बँक सुरू करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. सर्व रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्रे याठिकाणच्या औषध साठ्यावर केंद्रीय नियंत्रण राहावे व त्या अनुषंगाने औषध खरेदी प्रणाली विकसीत करावी आणि हे सर्व कामकाज ऑनलाईन असावे या दृष्टीने तत्पर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. अशाच प्रकारे रूग्णालयाच्या मेडिकल रेकॉर्ड विभागाचेही संपूर्ण डिजीटलायजेशन करण्याच्या दृष्टीने गतीमान कार्यवाही करावी असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

### २४ तास पोलीस कक्षाबाबत सूचना

वाशी येथील रुग्णालय हे महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील सर्वात जुने व सर्वात जास्त सेवा देणारे असल्याने या रुग्णालयावरील रूग्णांचा ताण विभागला जावा यादृष्टीने नेरूळ व ऐरोली रुग्णालयांचे अधिक सक्षमीकरण करण्याची जलद कार्यवाही करण्याबाबतही आरोग्य विभागास सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे वाशी रुग्णालयात येणारे विविध प्रकारचे रुग्ण लक्षात घेता त्या ठिकाणी २४ तास पोलीस कक्ष असावा यादृष्टीनेही कार्यवाही करण्याचे आयुक्तांनी सूचित केले.

# विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी आपला वाढदिवस कुष्ठरोग निवारण समितीमधील बांधवांसोबत मंगळवारी (दि. २) मोठ्या उत्साहात साजरा केला.

विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने शांतीवन येथे कुष्ठरोग निवारण समितीमधील बांधवांसोबत साजारा करून विद्यार्थ्यांना भोजन देत त्यांच्यासोबत संवाद साधला तसेच खाऊचे वाटप केले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, अनिल भोईर, आप्पा गायकवाड, अविनाश गायकवाड, शक्ती केंद्र प्रमुख प्रल्हाद भोईर, समाजसेवक संजीत भिंगारकर, राकेश मोरे, चांगदेव मराठे, अनिल पाटील, आनंद गोंधळी आदी उपस्थित होते.



**कळंबोली : भारतीय जनता युवा मोर्चा कळंबोलीच्या वतीने नमो युवा चौपाल व कॉफी विथ युथ हा कार्यक्रम झाला. मोठ्या संख्येने युवक कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात युवकांना संबोधित करण्यासाठी माजी नगरसेवक व स्थायी समिती सभापती अमर पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, सरचिटणीस निशान गील, अनुसूचित जाती कळंबोली अध्यक्ष विष्णू गायकवाड तसेच युवा मोर्चाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# वाशीत आज नंदेश उमप यांची संगीत मैफल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ ऐरोली शाखेच्यावतीने आरोग्य संजीवनी उपक्रमाअंतर्गत आरोग्यविषयक सुविधांकरीता निधी संकलन करण्यासाठी महाराष्ट्राचा कणखर आवाज म्हणून ओळखल्या जाणारया गायक नंदेश उमप यांच्या मराठी आणि हिंदी गाण्याची संगीत मैफल आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवारी (दि. ५) रात्री ८ वाजता वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात ही संगीत मैफल नवी मुंबईकर रसिकांना अनुभवता येणार आहे.

नवी मुंबई शहराच्या ऐरोली विभागात लायन्स क्लब मागील ३५ वर्षांपासून वैद्यकीय, सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सक्रीय आहे. लायन्स क्लबच्या माध्यमातून ऐरोलीत प्रथमच अद्ययावत नेत्र तपासणी केंद्र सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी लायन्स क्लबच्या वतीने आरोग्य संजीवनी उपक्रमाअंतर्गत वैद्यकीय केंद्र आणि इतर सामाजिक उपक्रमांसाठी मदत निधी उभारण्याकरीता संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले असून समाजातील दानशूर व्यक्तींना मदतीचे आवाहन लायन्स क्लबच्यावतीने मनोज ब्रीद यांनी केले आहे.

लायन्स क्लबने गणेश दर्शन स्पर्धा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, चित्रकला स्पर्धा आणि गरजू रुग्णांना माफक दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. या उपक्रमांना नागरिकांनी ज्या पद्धतीने प्रतिसाद दिला त्याच पद्धतीने नागरिकांनी गरजवंतासाठी आपला खारीचा वाटा उचलत या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन संस्थेद्वारे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी मनोज ब्रीद (९३२०२५०२७७), प्रिती शेट्टी (९९६७५५२४९९), संजय आवारे (९८२०००९९७९ ) यांच्याशी संपर्क साधावा.


# कडक उन्हातील आजारांबाबत विशेष काळजी घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

साधारणपणे मार्च ते जून या मान्सून पूर्वकाळात या उष्णतेच्या लाटा येताना दिसतात. वातावरणाचे तापमान ३७ डिग्री सेल्सियस असते तोपर्यंत मानवाला त्याचा तितकासा त्रास होत नाही. मात्र त्यानंतर मात्र मानवी शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते आणि त्याचे विपरित परिणाम मानवाच्या शरीरावर होऊ लागतात. तापमान आणि आर्द्रता यांचा मिळून होणारा परिणाम अधिक जास्त असतो. अति जोखमीच्या लोकांची उष्णतेच्या लाटे संदर्भात विशेष काळजी घेतली पाहिजे. यामध्ये – उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृध्द नागरिक आणि लहान मुले, स्थूल नागरिक, अयोग्य कपडे घालेले लोक, पुरेशी झोप न झालेले लोक, गरोदर महिला, अनियंत्रित मधुमेह, हृदयरोग असलेले लोक, अपस्मार रुग्ण, दारुचे व्यसन असलेले लोक, काही विशिष्ट औषधे घेत असलेले लोक तसेच निराश्रित, घरदार नसलेले गरीब लोक यांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास हा मुख्यत्वे किरकोळ स्वरुपाचा त्रास किंवा गंभीर स्वरुपाचा त्रास या प्रकारचा असतो. किरकोळ त्रासात उष्णतेमुळे शरीरावर रॅश उमटणे, हाता–पायाला गोळे येणे, चक्कर येणे तर गंभीर प्रकारात उष्माघाताचा समावेश होतो.

साधारणपणे उष्णतेमुळे झाल्यास त्या अनुषंगाने प्रथमोपचार करावेत.

(१) सनबर्न उष्णता विकारात कातडी लालसर होणे, सूज येणे, वेदना, ताप आणि डोकेदुखी ही लक्षणे आढळत असून त्यावर प्रथमोपचार करताना साधा साबण वापरून



आंघोळ करावी, घामास अडथळा करणारा कातडीवरील तेलकटपणा दूर करावा, कातडीवर फोड असतील तर वैद्यकिय सल्ला घ्यावा.

(२) उष्णतेमुळे स्नायूंमध्ये गोळे येणे (हिट क्रॅम्पस) अशा स्वरूपाच्या उष्णता विकारात हातापायात गोळे, पोटाच्या स्नायूत मुरडा, खूप घाम अशी लक्षणे आढळत असून अशा रुग्णाला सावलीत आणि थंड जागी हलवावे, दुखणाऱ्या स्नायूला हलका मसाज द्यावा तसेच उलटी झाली तर पाणी देऊ नये.

(३) उष्णतेमुळे प्रचंड थकवा (हिट एक्झॉस्टेशन) विकारात खूप घाम, थकवा, कातडी थंडगार, नाडीचे ठोके मंद, डोकेदुखी, चक्कर, उलटी ही लक्षणे आढळत असून या रूग्णाला थंड जागी शक्यतो एसी मध्ये झोपवावे, अंगावरील कपडे सैल करावेत, ओल्या व थंड फडक्याने अंग पुसून घ्यावे, थोडे थोडे पाणी पाजत रहावे तसेच उलटी होत असेल तर पाणी देऊ नये व दवाखान्यात हलवावे.

(४) उष्माघात (हिटस्ट्रोक) विकारात ताप (१०६ डि.फॅ.), कातडी – गरम आणि कोरडी, नाडीचे ठोके – वेगात आणि जोरात, घाम नाही, अर्धवट शुध्द अशी लक्षणे आढळत असून अशा रुग्णाला तत्काळ दवाखान्यात भरती करणे आवश्यक आहे. थंड जागी / एसीमध्ये कपडे काढावेत, थंड पाण्याने अंघोळ किंवा स्पन्जिंग करावे, तोंडाने पाणी देऊ नये.

उष्णतेपासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. प्रवासात पाणी सोबत ठेवावे. हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावेत. उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरावीत. उन्हात जाताना टोपी / हॅटखाली ओलसर कपडा ठेवावा. पाळीव प्राण्यांना सावलीत, थंड ठिकाणी ठेवावे. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवावे.

त्याचप्रमाणे – शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे. कष्टाची कामे उन्हात करू नये. पार्क केलेल्या वाहनात लहान मुलांना ठेवू नये. गडद रंगाचे, तंग कपडे वापरू नये. उन्हाच्या काळात स्वयंपाक करणे टाळावे. स्वयंपाकघर हवेशीर ठेवावे. मद्य, चहा, कॉफी, सॉफ्ट ड्रिंक्स घेणे टाळावे. जास्त प्रथिनयुक्त अन्न आणि शिळे अन्न खाऊ नये.

नागरिकांना उष्णता विकारांची लक्षणे आढळल्यास किंवा याबाबत अधिक माहिती हवी असल्यास आपल्या नजीकच्या नवी मुंबई महापालिका रुग्णालय किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## निवडक



### वडखळ येथे मतदार जनजागृती

**पाली :** रायगड लोकसभा मतदारसंघातील पेण विधानसभा मतदारसंघांमध्ये सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तहसीलदार तानाजी शेजाळ व नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांच्या निर्देशानुसार मंगळवारी (दि.२) जयकिसान विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, वडखळ येथील शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यासोबत मतदान जनजागृतीबाबत माहिती देण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांना संकल्प पत्रवाटप करण्यात आले. संकल्पपत्र विद्यार्थ्यांनी आपल्या आई, वडिल व इतर नातेवाईकांना वाचून दाखवून त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले. पेण निवडणूक शाखा, स्वीप पथकामधील प्रसाद म्हात्रे, देविदास बामणे, विनायक पवार, मंगेश शेंडगे, प्रवीण बैकर आणि मिलिंद महांगडे यांनी कार्यक्रम घेऊन मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

### डॉ. मीनल जाधवचा सत्कार



**माथेरान** : माथेरानमधील गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्टच्या शाळेतील शिक्षक विनोद जाधव यांची मुलगी मीनल हिने होमिओपॅथी मेडिकलमध्ये डॉक्टर पदवी प्राप्त केल्याबद्दल तिचा आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी मीनलचे पालक शिक्षक विनोद जाधव आणि आई सीमा जाधव उपस्थित होत्या. मीनल जाधव हिचे चौथीपर्यंतचे शिक्षण आसल (कर्जत) इथे झाले. त्यानंतर अकरावी, बारावी अभिनव ज्ञानमंदिर आणि त्यानंतर केडीएमसी होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज शिरपूर (धुळे) याठिकाणी झाले. तिने डॉक्टर पदवी केल्याबद्दल आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मीनलच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

### ॲड. जीविता पाटील सन्मानित

**अलिबाग** : लेक लाडकी अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमामध्ये पत्रकार भवन मुंबई येथे सामाजिक कार्यकर्त्या, विधीज्ञ तसेच तेजस्विनी फाउंडेशन रायगड संस्थापिका ॲड. जीविता सुरज पाटील यांना भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी समारंभ अध्यक्षा चारुशीला देशमुख, संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, सामाजिक व शैक्षणिक संस्था स्वागताध्यक्ष डॉ. मोनिका चोप्रा-जगताप, प्रमुख पाहुणे स्वाती घोसाळकर, स्वाती ओक तसेच लेक लाडकी अभियान संयोजक मुंबई सुरज भोईर आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ती जीविता पाटील यांनी अंगणवाडीसेविका म्हणून काम करीत असताना आपले शिक्षण पूर्ण केले. समाजातील वेगवेगळ्या सामाजिक संस्थांचे पदभार सांभाळले. महिलांविषयी असणाऱ्या शासकीय निमशासकीय कमिटी सदस्या, प्रमुख वक्ता, निवेदक, परीक्षक, मार्गदर्शक, पत्रकार इ. अनेक भूमिका पार पाडून आपला व मुलाचा उदरनिर्वाह करून समाजात आपला एक मानाचा ठसा उमटविला आहे.

### रसायनीत होणार हरिनामाचा गजर

**मोहोपाडा** : वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी, पाताळगंगा, खालापूर व पनवेलतर्फे रसायनीत मोहोपाडा येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर ९ एप्रिल रोजी जनता विद्यालय मोहोपाड्याच्या भव्य मैदानावर श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचा गजर रंगणार आहे. या सप्ताहानिमित्त परिसरातील महाराजांचे कीर्तन व भजन मोहोपाड्याच्या मैदानावर होणार आहे. हा कार्यक्रम सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत चालणार असून ९ एप्रिल रोजी काकडा आरती तसेच हभप काशिनाथमहाराज लबडे, हभप कृष्णा जोडे, हभप राम खाने, हभप बळीराम दळवी, हभप रघुनाथ भगत उपस्थित असणार असून सामूदायिक गाथा पारायण, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन होणार आहे. या सप्ताहाचा समारोप १६ एप्रिल रोजी होणार असून सदर सप्ताहाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


# खारआंबोली कालव्याची प्रतीक्षा संपली

## १५ कोटींच्या निविदा निघाल्या; लवकरच कामाला सुरुवात

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील खारआंबोली धरणाचे पाणी शेतीपर्यंत पोहचू न शकल्याने अनेक वर्षांपासून भातशेतीव्यतिरिक्त अन्य पिके घेण्यास शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. २०१४मध्ये राज्यभर जलयुक्त शिवार योजनेची अंमलबजावणी करण्यात आली, परंतु आंबोली धरणावर अवलंबून उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम सात वर्षांपासून बंद पडल्याने शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी मिळालेच नाही, मात्र नुकत्याच या कालव्याच्या कामासाठी १५ कोटींच्या निविदा काढण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कालव्याचे पाणी मिळाल्यास तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे. आंबोली धरणाचे लघुपाटबंधारे शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची प्रकल्पांतर्गत उजव्या-डाव्या तीर कालव्याचे काम जून २०१५पासून बंद आहे. धरणाची पाणी साठवणूक क्षमता मोठी आहे. कालव्याचे काम पूर्ण झाल्यास बागायती, दुग्ध व्यवसाय व कृषी पर्यटनाला चालना मिळेल. आंबोली धरण २००९ बांधण्यात आले असून, त्यासाठी सुमारे ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला. स्थानिक शेतकऱ्यांना दुबार पीक घेता यावे, त्याचबरोबरच तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी मिटावी, या उद्देशाने धरण बांधण्यात आले. मुरूडसह लगतच्या १२ गावांना धरणातून पाणीपुरवठा होतो.



आंबोली धरण उजव्या तीर कालव्याचे काम १० किमी. प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत ६.१ किमी. काम अपूर्ण आहे, तर डाव्या तीर कालव्याचे २.६४ किमी. प्रस्तावित असून, १.६४ किमी. काम सात वर्षांपासून रखडले आहे. तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे, परंतु १५ कोटींची कालव्याची निविदा आहे, त्यात बंदिस्त कालवा करण्याचे ठरले असून, शेतीच्या खालून पाईप जाणार असल्याने शेतकऱ्याला जमिनीचा वापर शेतीसाठी करता येणार आहे.

**कालव्यामुळे मुरुड तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे. आंबोली धरण २००९ साली बांधण्यात आले असून त्यासाठी सुमारे ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला. पूर्वीचा ओपन कालवा रद्द करून मोठाले पाईप टाकून जमिनीखालून कालवा काढण्याचा प्रस्ताव निर्णय येणार आहे. त्यासाठी १५ कोटींच्या निविदा निघाल्यात. लवकरच काम सुरू होईल. कामाचा कालावधी एक वर्षाचा असणार आहे.**
**-ए. डी. रोकडे,**
**कार्यकारी अभियंता, पेण**

## वणव्यामुळे कडधान्य पीक जळालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत

**महाड : प्रतिनिधी**

महाड आणि माणगाव तालुक्यातील ज्या ज्या शेतकऱ्यांचे वणव्यांमुळे शेतीचे नुकसान झाले आहे अशा पीडित शेतकऱ्यांना आमदार भरत गोगावले यांनी मदतीचा हात पुढे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

माणगाव तालुक्यातील लोणेरे, गोरेगाव, देवळी, मूर या भागातील शेतकरी कडधान्याचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेतात. महाड तालुक्यामध्येदेखील खाडी विभागात असलेले सव, गोठे, बेबलघर तेलंगे, जुई, कुंबळे, रोहन या भागामध्ये तूर, वाल, मूग या कडधान्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. यातील काही गावांतील शेतकऱ्यांचे वणव्यामुळे नुकसान झाले. देवळी मूर येथील शेतकरी गुणाजी भोस्तेकर, अशोक भोस्तेकर, योगेश भोस्तेकर, प्रदीप भोस्तेकर, शांताराम भोस्तेकर, बाळाराम भोस्तेकर, त्याचबरोबर महाड तालुक्यातील खाडी विभागात असलेल्या रोहन गावातील शेतकरी सुरेश महादेव गोडांबे यांना आमदार गोगावले यांनी मदतीचा हात पुढे करून दिलासा दिला आहे.

शेतीच्या नुकसानाचे शासनाकडून पंचनामे जरी करण्यात आले असले तरी त्वरित मदत



मिळत नाही, परंतु आमदार गोगावले यांनी आम्हा शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहून आम्हाला त्यांनी मदतीचा हात दिला आणि म्हणूनच आम्ही पुन्हा उभे राहू शकलो, अशी प्रतिक्रिया पीडित शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

कोकणामध्ये उन्हाळ्यात वणव्यांचे प्रमाण वाढते. यामुळे शेतकऱ्यांचे त्याचबरोबर पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होते. वणवे लागू नयेत, यासाठी लोकप्रबोधन करण्याची आवश्यकता असून महाड वनविभागाकडून देखील वनवे लागू नयेत यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न केले जात असल्याचे आमदार गोगावले यांनी सांगितले.

## एप्रिलअखेर ताकई रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे अभियंत्यांचे आश्वासन

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील ताकई रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून अर्धवट असून कामाला वनखात्याच्या परवानगीअभावी मुहूर्त मिळत नव्हता. महिन्याभरापूर्वीच वनखात्याने डांबरीकरणासाठी परवानगी दिली असतानाही ठेकेदार काम सुरू करीत नसल्याने ताकई ग्रामस्थांनी आक्रामक पवित्रा घेत बांधकाम अभियंता आणि संबंधित ठेकेदाराला मंगळवारी (दि.२) जाब विचारला. त्यावर एप्रिल महिन्याअखेरपर्यंत काम पूर्ण होईल, असे आश्वासन बांधकाम अभियत्यांनी दिले आहे.



खोपोली नगरपालिका हद्दीतील ताकई रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून अर्धवट स्थितीत आहे. मागील काळात अनेक प्रशासन अधिकारी बदलले ठेकेदार बदलले आणि भूमिपूजनही झाले, मात्र हा रस्ता अद्याप पूर्ण होत नाही. ताकई गाव ते बाँझर सोसायटीपर्यंतचा रस्ता पूर्ण झाला, मात्र पुढील ३०० ते ४०० मीटर रस्ता वनखात्याच्या हद्दीतून असल्याने काम करण्यास परवानगी नव्हती. त्यामुळे नागरिकांना खड्ड्यातून वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागत होती. महिन्याभरापूर्वीच वनखात्याने डांबरीकरणासाठी परवानगी दिली असतानाही ठेकेदार काम सुरू करीत नसल्याने ताकई गावातील ग्रामस्थांनी आक्रामक पवित्रा घेतला. या वेळी जयवंत पाटील, किसन पाटील, राकेश पाटील, डॉ.निकेश पाटील, संजय पाटील, राकेश पाटील, दिनेश पाटील, मंदार पाटील, बाँझर सोसायटीचे अध्यक्ष समीर देवकर, बांधकाम अभियंता अनिल वाणी, सतीश हाडप उपस्थित होते.

अभियंता अनिल वाणी यांनी, एप्रिल महिन्याअखेरपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होईल, असे आश्वासन दिले आहे.

## कर्मचाऱ्यांची त्रैमासिक सांख्यिकी माहिती सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांनी त्यांच्या आस्थापनेवर असणाऱ्या मनुष्यबळाची दर तिमाही (मार्च/जून/सप्टेंबर/डिसेंबर) माहिती महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन सादर करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त अ.मु.पवार यांनी केले आहे.

मार्च २०२४ अखेर संपणाऱ्या जानेवारी ते मार्च या तिमाहीची नमुना ईआर-१ मधील त्रैमासिक विवरणपत्र आस्थापनांनी या विभागाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर एम्प्लॉयमेंट या टॅबवरील एम्प्लॉयर (लीस्ट अ जॉब) याला क्लीक करून आपल्या आस्थापनेचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगिन करावे. लॉगिन झाल्यावर आपल्या आस्थापनेची माहिती अद्ययावत करून ईआर-१वर क्लिक करावे. एन्टर ईआर-१ याद्वारे आपल्याकडील अचूक माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करावी. हे त्रैमासिक विवरणपत्र सादर करण्याचा कालावधी १ ते ३० एप्रिल आहे.

त्याचप्रमाणे प्रत्येक आस्थापनेने आपल्या आस्थापनेचा नोंदणी तपशीलदेखील आवश्यक ती सर्व माहिती नोंदवून तत्काळ अद्यावत करावी. या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचे सहकार्य अथवा युजर आयडी/पासवर्ड याबाबत माहिती आवश्यक असल्यास या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांकावर (०२१४१-२२२०२९) अथवा या कार्यालयाचे लिपिक-टंकलेखक म.भा.वखरे यांचा (९४२१६१३७५७)वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुरूड ते कार्ला 'लाल परी' धावणार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

एकविरा यात्रेसाठी मुरूड ते कार्ला ही बससेवा एसटी महामंडळाने उपलब्ध केली आहे. मुरूड मनसेचे तालुका सचिव राजेश तरे यांनी विभागीय वाहतूक अधिकारी पेण, रामवाडी येथे निवेदनाने मागणी केली होती.

१५ एप्रिलपासून एकविरा यात्रेस प्रारंभ होत आहे. मुरूड तालुक्यातील मोठ्या संख्येने भाविक या यात्रेस जात असतात. या भाविकांच्या सेवेसाठी मुरूड ते एकविरा ही एसटी १३, १४ एप्रिलपासून सुरू होत असून मुरूड आगारात बुकिंग सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती मुरूड मनसेचे तालुका सचिव राजेश तरे यांनी दिली.

## भिसेगाव आदिवासीवाडीस अधिकाऱ्यांची भेट; समस्या घेतल्या जाणून

**कर्जत : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भिसेगाव आदिवासीवाडीमध्ये तहसीलदार आणि नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी या वाडीला भेट देऊन समस्या जाणून घेतल्या.

भिसेगाव येथील आदिवासीवाडीमधील आदिवासींची घरे नावावर करण्याबाबत शबरी योजना



राबविणे, विधवा महिलांना तसेच वृद्धांना पेन्शन (संजय गांधी निराधार) योजना व ज्या काही शासकीय योजना आहेत ते या आदिवासी बांधव व महिलांसाठी राबविण्यात याव्यात तसेच जातीचे दाखले त्यांना तत्काळ देण्यात यावे, अशी मागणी या वेळी ग्रामस्थांनी केली आहे.

यामुळे तहसीलदार शीतल रसाळ व मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी आदिवासीवाडीला भेट दिली. या वेळी अमोघ कुलकर्णी व आदिवासी बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाडीतील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.

विविध योजना तसेच अन्य समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. जितके होतील तितके प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतील. निवडणुकीच्या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजी घेऊन प्रश्न सोडविले जातील. काही प्रश्न निवडणुकीनंतर सोडविले जातील, असे आश्वासन दोन्ही अधिकाऱ्यांनी दिले.

# इफ्तार पार्टीतून सामाजिक एकोप्याचे दर्शन -ॲड. राजीव साबळे

**माणगाव : प्रतिनिधी**

इफ्तार पार्टीमुळे हिंदू-मुस्लिम समाजातील स्नेहभाव अधिक वृद्धिंगत होऊन सामाजिक एकोप्याचे दर्शन घडते, असे प्रतिपादन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी येथील इफ्तार पार्टी कार्यक्रमात केले. या कार्यक्रमास आमदार भरत गोगावले यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरू असून या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटे लवकर उठून रोजा (उपवास) धरतात. सायंकाळी मगरीब नमाजच्या बांगीबरोबर हा रोजा सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात. या इफ्तार पार्टीच्या निमित्ताने ॲड. राजीव अशोक साबळे व सहकाऱ्यांनी लोकनेते माजी आमदार अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय, द. ग. तटकरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.३) इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. कार्यक्रमास शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, तालुका रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संजयआण्णा साबळे, श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी अल्पसंख्याक





सेल अध्यक्ष अल्ताफ धनसे, जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, नगरसेवक सचिन बोंबले, द. ग. तटकरे महाविद्यालय कमिटीचे सदस्य नरेंद्र गायकवाड, सुधाकर शिपूरकर, गणेश वाघरे, इंग्रजी माध्यम शाळेच्या मुख्याध्यपिका मनीषा मोरे, स्कूल कमिटी चेअरमन अरुण पवार, भाजप शहराध्यक्ष नितीन दसवते, स्वच्छता व आरोग्य सभापती शर्मिला सुर्वे, नगरसेवक दिनेश रातवडकर, माजी स्वीकृत नगरसेवक नितीन बामगुडे, ॲड. विनोद घायाळ, शिवसेना माणगाव शहर प्रमुख सुनील पवार, स्वीकृत नगरसेवक सिराज परदेशी, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, तळेगाव सरपंच निलेश म्हात्रे, मनोज सावंत, राजेश कदम, वैभव मोरे, विनोद सुतार, यासिन परदेशी, विरेश येरुणकर, प्रसाद धारिया, दाऊद मापकर, मौलाना सैफुल्ला, मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुल रहिमान हाजीते, ॲड. सुशील दसवते, अनिल सोनार, समाधान उतेकर, सचिन गोरेगावकर, शेखहुसेन आकुस, युनूस पिलपिले, सचिन गोरेगावकर, लियाकत परदेशी, रऊफ जामदार, सामाजिक कार्यकर्ते अकबर परदेशी, डॉ. इस्माईल राहटविलकर, डॉ. आबासाहेब पाटणकर, कृष्णा दोशी, मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# कोलकाताच्या विजयाची हॅट्ट्रिक

## दिल्लीवर मोठा विजय मिळवून गुणतालिकेतही अव्वल



**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने प्रथम फलंदाजी करताना २७२ धावा करीत आयपीएलमधील इतिहासातील दुसरी सर्वात मोठी धासंख्या उभारली, ज्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ १६६ धावांवर गारद झाला. यामुळे केकेआरने मोठा विजय मिळवता सामना १०६ धावांनी खिशात घातला. या विजयासह सलग तिसरा सामना जिंकत कोलकाताने गुणातालिकेत अव्वल स्थान काबीज केले.

सुनील नरेन आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या अर्धशतकांव्यतिरिक्त आंद्रे रसेलच्या ४१ धावांच्या तुफानी खेळीने कोलकाताला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. त्यामुळे कोलकाताने २० षटकांत ७ बाद २७२ धावा करताना दिल्ली कॅपिटल्सपुढे २७३ लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खूपच खराब झाली होती, ज्यातून त्यांना शेवटपर्यंत सावरता आले नाही. दिल्लीसाठी कर्णधार ऋषभ पंतने ५५ धावा केल्या आणि ट्रिस्टन स्टब्सने ५४ धावांची अर्धशतकी खेळी खेळली असली तरी संघाला १०६ धावांच्या पराभवापासून वाचवता आले नाही.

कोलकातासाठी फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी डावाची सुरुवात केली. सॉल्ट केवळ १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला असला तरी त्यानंतर नरेन आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी झाली. एकीकडे नरेनने ३९ चेंडूंत सात चौकार आणि सात षटकारांसह ८५ धावांची तुफानी खेळी केली, तर आयपीएलमधील पदार्पणाच्या डावात अंगक्रिशने २७ चेंडू खेळून ५४ धावा केल्या. या खेळीत त्याने पाच चौकार आणि तीन षटकार मारले. शेवटच्या षटकांमध्ये आंद्रे रसेलने ४१ धावा केल्या, तर रिंकू सिंगनेही आठ चेंडूंत २६ धावांची छोटीशी खेळी खेळून महत्त्वपूर्ण योगदान दिले. कोलकाताने पहिल्या १० षटकांत १३५ धावा आणि शेवटच्या १० षटकात १३७ धावा करीत दिल्लीच्या गोलंदाजांचा घाम फोडला.

दिल्ली कॅपिटल्ससाठी डावाची सुरुवात खूपच खराब झाली. दिल्लीने पहिल्या ३३ धावांत चार महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतर ऋषभ पंत आणि ट्रिस्टन स्टब्स यांच्यात पाचव्या विकेटसाठी ९३ धावांची भागीदारी झाली, पण संघाला विजयापर्यंत नेण्यासाठी ती अपुरी ठरली. पंतने २५ चेंडूंत ५५ धावांची, तर स्टब्सने ३२ चेंडूंत ५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. त्यानंतर संघाने सातत्याने विकेट गमावल्या, ज्यामुळे दिल्लीला १०६ धावांनी मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

फलंदाजीसोबतच गोलंदाजीतही कोलकाताने आपला दबदबा कायम राखला. वरुण चक्रवर्तीने चार षटकांत ३३ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. वैभव अरोरानेही प्रभावित केले, ज्याने चार षटकांत २७ धावा देत तीन गडी बाद केले. त्याचवेळी मिचेल स्टार्कने यंदाच्या आयपीएलमध्ये विकेटचे खाते उघडत तीन षटकांत २५ धावा देत दोन जणांना माघारी धाडले, तर सुनील नरेन आणि आंद्रे रसेल यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली.

# सीनियर राष्ट्रीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी रायगडच्या दोन खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पॉवरलिफ्टिंग इंडियाच्या वतीने हैदराबाद येथे क्लासिक सीनियर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ८ ते १२ एप्रिलदरम्यान होणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात रायगडचे बबन बाबू झोरे (५९ किलो वजनी गट) आणि गणेश संजय तोटे (१०५ किलो वजनी गट) यांची निवड झाली आहे.

या निवडीबद्दल बबन झोरे यांना जीव्हीआर फिटनेसचे संचालक विनोद येवले आणि गणेश तोटे यांना प्रमोद विजय पवार





(फिटनेस ऑन जिम, संचालक, पनवेल) आणि त्यांचे प्रशिक्षक विशाल मुळे (भांडूप, मुंबई) यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, खजिनदार राहुल गजरमल यांनी दोघांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. दोन्ही खेळाडूंनी राज्य स्पर्धेत चांगली कामगिरी केली असल्याने ते राष्ट्रीय स्पर्धेत पदक पटकावतील, असा विश्वास राष्ट्रीय पदक विजेते माधव पंडित यांनी व्यक्त केला आहे.

### किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत

# हरियाणाने विजेतेपद राखले

**मुंबई : प्रतिनिधी**

हरियाणाने ३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद राखले. पटणातील बिहार येथील पाटलीपुत्र क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत हरियाणाने अत्यंत चुरशीच्या लढतीत राजस्थानचा कडवा प्रतिकार ३५-३३ असा मोडून काढत सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपदाला गवसणी घातली.

पूर्वार्धात २०-१७ अशी आघाडी घेणाऱ्या हरियाणाला उत्तरार्धात राजस्थानने विजयासाठी चांगलेच झुंजविले. सामना संपायला काही मिनिटे शिल्लक असताना राजस्थानने हरियाणावर लोण देत आपली आघाडी २९-३० अशी कमी केली. राजस्थानच्या ५ नंबरच्या चढाईच्या खेळाडूने एक गुण घेत ३०-३० अशी बरोबरी साधली, पण हरियाणाच्या १ नंबरने शेवटच्या काही सलग चढाया करीत बोनस व काही गुण मिळवित संघाला दोन गुणांनी विजय मिळवून दिला. गतवर्षी हरियाणाने तामिळनाडूला पराभूत करीत विजेतेपद मिळविले होते. यंदा ते पुन्हा एकदा आपल्याकडेच राखले.

या अगोदर झालेल्या उपांत्य फेरीत हरियाणाने गोव्याला ३१-२४ असे, तर राजस्थानने उत्तरांचलला ५२-३३ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती.

# मुंबई इंडियन्ससाठी खूषखबर; सूर्यकुमार फिट



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १७व्या हंगामाची सुरुवात पाच वेळचा चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्ससाठी खास झालेली नाही. मुंबईने आतापर्यंत तीन सामने खेळले आणि तिन्ही सामन्यांमध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे. मुंबई पॉइंट टेबलमध्ये तळाशी म्हणजेच १०व्या स्थानावर आहे, पण आता या सर्व अडचणी आणि संकटांमध्ये मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी आली आहे. मुंबईचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवला आयपीएल खेळण्यासाठी ग्रीन सिग्नल मिळाला आहे.


सूर्यकुमार यादवची अनुपस्थिती मुंबईसाठी अनेक समस्या निर्माण करत होती. सूर्याने मुंबईसाठी मागील हंगामातील बऱ्याच सामन्यात फिनिशरची भूमिका निभावली होती. क्षणात सामना बदलण्याची क्षमता त्याच्यात आहे. वृत्तानुसार सूर्याला आयपीएलमध्ये खेळण्यासाठी ग्रीन सिग्नल मिळाला आहे. मुंबईचा पुढील सामना रविवारी (दि.७) दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणार आहे. या सामन्यात सूर्या खेळताना दिसण्याची शक्यता आहे. तो दिल्लीविरुद्ध खेळला तर वाईट टप्प्यातून जात असलेल्या मुंबईसाठी मोठा दिलासा देणारा ठरेल.

बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने (एनसीए) मधल्या फळीतील फलंदाज सूर्यकुमार यादवला खेळण्यास परवानगी दिली. तीन महिन्यांहून अधिक काळ तो क्रिकेट खेळलेला नाही. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि एनसीएच्या फिजिओंना कोणताही धोका पत्करायचा नव्हता. त्यामुळे आता पूर्णपणे दुखापतीतून सावरल्यानंतर सूर्याला खेळण्याची परवानगी देण्यात आली. आता तो मुंबई इंडियन्स संघात दाखल होऊ शकतो.

दक्षिण आफ्रिकेतील टी-२० मालिकेदरम्यान सूर्यकुमार यादवला घोट्याला दुखापत झाली होती. त्यामुळे सुरुवातीला तो सात आठवड्यांसाठी बाहेर पडला होता. तथापि, नंतर आणखी एक दुखापत झाली आणि त्याला हर्नियाचे ऑपरेशन करावे लागले, ज्यामुळे तो अद्याप मैदानापासून दूर होता.

# पराभवानंतर दिल्लीचा कर्णधार पंतसह इतर खेळाडूंनाही दंड

## स्लो ओव्हर रेटमुळे दुसऱ्यांदा कारवाई



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंतने जोरदार पुनरागमन करीत कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात विस्फोटक फलंदाजी केली. संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला असला तरी त्याने २५ चेंडूंत चार चौकार आणि पाच षटकारांसह ५५ धावा केल्या, मात्र २७३ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना पंतच्या नेतृत्वाखालील संघाला १०६ धावांच्या मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. सामना संपल्यानंतर कर्णधार ऋषभ पंतला आणखी एक धक्का बसला.

सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी दिल्ली कॅपिटल्सला दंड ठोठावण्यात आला आहे. या मोसमात दिल्लीला दुसऱ्यांदा हा दंड ठोठोवण्यात आला आहे. त्यामुळे कर्णधार ऋषभ पंतवर २४ लाखांचा दंड आकारला गेला आहे.

आयपीएल आचारसंहितेचे वारंवार उल्लंघन केल्याबद्दल दिल्ली कॅपिटल्सचे उर्वरित खेळाडू म्हणजेच प्लेईंग इलेव्हन आणि इम्पॅक्ट खेळाडूंनाही दंड ठोठावला आहे. प्रत्येक खेळाडूला सहा लाख रुपये किंवा मॅच फीच्या २५ टक्के दंड भरावा लागेल.

# ...तर पांड्याबद्दल चाहत्यांची तीव्र प्रतिक्रिया टाळता आली असती!

## मुंबई इंडियन्सच्या कर्णधार बदलावर रवी शास्त्रींचे भाष्य


**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलमधील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे मुंबई इंडियन्सचे कर्णधारपद. मुंबई संघाने त्यांचा नियमित कर्णधार रोहित शर्माच्या हार्दिक पांड्याकडे संघाची जबाबदारी सोपवली. यामुळे सध्या मुंबई संघाला आणि पांड्याला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागत आहे. यावर माजी खेळाडू रवी शास्त्री यांनी वक्तव्य केले आहे.

हार्दिक पांड्याला कर्णधारपदी नियुक्त करताना मुंबई इंडियन्सने संवादात स्पष्टता दाखवली असती, तर पांड्याबद्दल चाहत्यांची तीव्र प्रतिक्रिया टाळता आली असती, असे मत भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले. शास्त्रींनी हार्दिकला शांत राहून त्याच्या कामगिरीने प्रत्युत्तर देण्याचा सल्लाही दिला.

रवी शास्त्री म्हणाले, हा काही भारतीय संघ खेळत नाहीय. हे फ्रँचायझी क्रिकेट आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला आहे. ते या संघाचे मालक आहेत आणि कर्णधाराची नियुक्ती करणे हा त्यांचा अधिकार आहे. माझ्या मते, मुंबई संघाने संवादात स्पष्टता ठेवली असती तर हे प्रकरण अधिक चांगल्या प्रकारे हाताळता आले असते.

शास्त्री पुढे म्हणाले, जर तुम्हाला हार्दिक पांड्याला कर्णधार बनवायचे होते तर



तुम्ही असे म्हणायला हवे होते की, आम्ही भविष्याचा विचार करता हा निर्णय घेत आहोत. रोहित शर्माने कर्णधार म्हणून उत्कृष्ट भूमिका साकारली आहे आणि हे आपल्या सर्वांना माहीत आहे. संघाला यशस्वीपणे पुढे नेण्यासाठी रोहितने पुढील तीन वर्षे हार्दिकला मदत करावी अशी आमची इच्छा आहे.'

हार्दिकच्या नेतृत्त्वाखालील संघाला अजून एकही विजय मिळवता आला नाही. शास्त्री म्हणाले, हार्दिकला माझा सल्ला असेल की शांत राहा, धीर धर, सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष कर आणि फक्त तुझ्या खेळावर लक्ष केंद्रित कर. मुंबई इंडियन्सचा संघ उत्कृष्ट असून त्यांना लय मिळाल्यास ते सलग तीन-चार सामने जिंकू शकतील आणि त्यानंतर ही चर्चा आपोआप बंद होईल. दरम्यान, मुंबई इंडियन्सचा पुढील सामना वानखेडे स्टेडियमवर दिल्ली कॅपिटलसविरुद्ध ७ एप्रिलला होणार आहे.

# मुस्तफिजुर रहमान पुढच्या किमान दोन सामन्यांना मुकणार



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जला त्यांच्या मागील सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून पराभव पत्करावा लागला. अशातच आता त्यांच्या संघाची आणखी डोकेदुखी वाढल्याचे दिसते, कारण संघाचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान पुढच्या किमान दोन सामन्यांना मुकणार आहे.

खरंतर ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी यूएस व्हिसाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुस्तफिजुर बांगलादेशला परतल्यामुळे आयपीएलच्या काही सामन्यांना मुकणार आहे. त्याने आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील सलामीच्या सामन्यात चेन्नईसाठी चमकदार कामगिरी करून सामनावीरचा पुरस्कार पटकावला होता. त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात घातक गोलंदाजी केली होती. चार षटकांत २९ धावा देत चार बळी घेऊन मुस्तफिजुरने आपल्या गतविजेत्या संघाला सहज विजय मिळवून दिला.

डावखुरा वेगवान गोलंदाज सध्या सात बळींसह पर्पल कॅपच्या शर्यतीत आघाडीवर आहे. चेन्नईचा आगामी सामना शुक्रवारी (दि.५) सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणार आहे. जर मुस्तफिजुरने त्याच्या पासपोर्टचा विषय मार्गी लावला तर तो एप्रिलमध्ये किमान चार सामन्यांसाठी उपलब्ध असेल.

# दिल्लीच्या गोलंदाजांची धुलाई करणारा अंगक्रिश रघुवंशी चर्चेत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४मधील १६वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात केकेआरने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. केकेआरसाठी सलामी द्यायला आलेले सुनील नरेनने दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजीचे कंबरडे मोडले, तर दुसऱ्या बाजूला भारताचा युवा फलंदाज अंगक्रिश रघुवंशी याने आपल्या स्फोटक अर्धशतकाने आपल्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचला आहे.

अंगक्रिश रघुवंशीने आरसीबीविरुद्धच्या सामन्यात प्रभावशाली खेळाडू म्हणून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते, परंतु तो आयपीएल कारकिर्दीचा पहिला डाव दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळला. यात त्याने २७ चेंडूंत पाच चौकार आणि तीन गगनचुंबी षटकार मारत ५४ धावांची खेळी केली.

अंगक्रिश रघुवंशीचा जन्म ५ जून २००५ रोजी झाला. त्याचे क्रिकेट कौशल्य सुधारण्यासाठी त्याने गुडगाव सोडले आणि वयाच्या ११व्या वर्षी मुंबईत आला. आंगक्रिश हा टॉप ऑर्डरचा फलंदाज आहे आणि तो ऑफ-स्पिन गोलंदाजीही करू शकतो. अंडर-१९ क्रिकेट विश्वचषक २०२२मध्ये त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप प्रसिद्धी मिळाली. त्या विश्वचषकात भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू अंगक्रिश होता. त्याने सहा सामने खेळून २७८ धावा केल्या होत्या.

अंगक्रिश रघुवंशी लहानपणापासूनच खेळाडू बनणे जवळजवळ निश्चित होते, कारण तो खेळाडूंच्या कुटुंबातून आला आहे. त्याची आई मलिका रघुवंशी यांनी बास्केटबॉलमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याचे वडील अवनीश देशासाठी टेनिस खेळले आहेत. त्याचा भाऊ क्रिशांग रघुवंशी हादेखील वडिलांप्रमाणे टेनिस खेळतो. याशिवाय त्याचे काका भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईसाठी क्रिकेट खेळले आहेत.

# भारत-बांगलादेश महिला क्रिकेट संघांच्या ट्वेंटी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा महिला क्रिकेट संघ पाच सामन्यांच्या ट्वेंटी-२० मालिकेसाठी बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे. २८ एप्रिल ते ९ मे या कालावधीत ही मालिका खेळवली जाणार आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार भारतीय संघ २३ एप्रिलला बांगलादेशात पोहचेल आणि १० मे रोजी भारताकडे रवाना होईल. सर्व सामने सिल्हेट येथे खेळवले जाणार आहेत.

दरम्यान, मागील वर्षी भारतीय संघ जेव्हा बांगलादेशात गेला होता तेव्हा ती मालिका नाना कारणांनी चर्चेत राहिली होती. अखेरच्या वन डे सामन्यात काही नाट्यमय घडामोडी घडल्या. ढाका येथे झालेल्या निर्णायक वन डे सामन्यात भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरला वादग्रस्त निर्णयावर बाद दिल्याने तिने अम्पायर्सच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करीत खडेबोल सुनावले होते. याशिवाय सामन्यानंतर बोलताना तिने काही गंभीर आरोप केले होते. त्यामुळे हरमनप्रीतला लेव्हल २ अंतर्गत तिच्या मॅच फीच्या ५० टक्के दंड ठोठावण्यात आला होता तसेच तिच्यावर दोन सामन्यांसाठी बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे आगामी मालिका हरमनप्रीतसह भारतीय संघासाठी खूप खास असणार आहे.

मालिकेतील सर्व सामने सिल्हेट येथे खेळले जाणार असून त्यांच्या तारखा अनुक्रमे २८ एप्रिल, ३० एप्रिल, २ मे, ६ मे व ९ मे अशा आहेत.

# 'किंग खान'ने जिंकली क्रिकेटप्रेमींची मने

**विशाखापट्टणम** : कोलकाता नाइट रायडर्स संघाने दिल्ली कॅपिटल्स संघाचा एकतर्फी पराभव केला. सामना संपल्यावर केकेआरचा सहमालक बॉलीवूड अभिनेता शाहरूख खान मैदानात आला आणि त्याने संघाच्या प्रत्येक खेळाडूला मिठी मारली. या विजयासाठी शाहरूखने कर्णधार श्रेयस अय्यर, मार्गदर्शक गौतम गंभीर, रिंकू सिंग व युवा फलंदाज अंगक्रिश रघुवंशी यांचे अभिनंदन केले. शाहरूख दिल्ली कॅपिटल्सच्या खेळाडूंनाही भेटला. विशेषतः तो ऋषभ पंतशी बोलला व शानदार अर्धशतक झळकावल्याबद्दल त्याचे कौतुक केले.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com